| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ३९ वा | मंगळवार दिनांक १४ एप्रिल, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### दरोड्याच्या तयारीत असणाऱ्यावर गुन्हा दाखल

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे : राहुल रामचंद्र काळे, रा. रामेश्वरवाडी ता. केज. जि. बीड ह.मु. पारगाव ता. वाशी, राजु. अर्जुन पवार, रा. हिवरा, दादा शामराव काळे, रा. बारलोणी पारधी पिढी वाशी ता. वाशी, चिवल्या उर्फ बबन सोपान काळे, रा. खैराड वस्ती वाशी ता. वाशी जि. धाराशिव हे दि. १०.०४.२०२६ रोजी ०३.०० ते ०४.४५ वा. सु. गोलेगाव शिवारातील पवनचक्की क्र डब्ल्यु. एस.एच ०१ येथे ड्युटीवरी गार्ड दत्तात्रय कागदे पेट्रोलिंग कर्मचारी यांना नमुद आरोपींनी दोन विना नंबरच्या मोटारसायकलवर येवून दगडफेक करुन पळुन जात असताना राहुल काळे हा मोटार सायकलवर दरोडा टाकण्याचे पुर्व तयारीनिशी साहित्य तलवार सदृष्य शस्त्र, लोखंडी कत्ती कत्ती सह मिळून आला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शिवहार बाहकृष्ण राउत, वय ३४ वर्षे, व्यवसाय सेक्युरिटी सुपरवाझर साई सेक्युरिटी इंन्ट्रीगेटेड कंपनी तेरखेडा रा. वाणी गल्ली वाशी ता. वाशी जि. धाराशिव यांनी दि.११.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### येरमाळ्यातून मोटारसायकलची चोरी

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाण अंतर्गत फिर्यादी -औदुंबर सुरेश बारकुल, वय ३८ वर्षे, रा. येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव यांची अंदाजे ४५,००० किंमतीची हिरो कंपनीची मोटरसायकल कळंब रोडवर हॉअेल वारकरी समोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी औदुंबर बारकुल यांनी दि.११.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### मोटारसायकलची चोरी

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत अनिल विठ्ठलराव जाधव, ह.मु. समर्थनर भुम ता. भुम जि. धाराशिव यांची मोटरसायकल बागवानगल्ली शेंडगे दुकानाचे बाजूस भुम येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली.

## विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान आणि पत्रकारिता पुरस्कारांचे वितरण

# पत्रकारांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्नशील: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

धाराशिव,दि.१२ एप्रिल (जिमाका) महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असून समाजातील प्रत्येक घटकाचा सन्मान राखला गेला पाहिजे.पत्रकारांचे कार्य अत्यंत आव्हानात्मक असून ते निष्ठेने आणि व्रतस्थ भावनेने पार पाडले जाते.त्यामुळे पत्रकारांच्या समस्या जाणून घेऊन त्या निकाली काढण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह, नगर परिषद,धाराशिव येथे दैनिक 'पुण्य नगरी'च्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त कूपन स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण,'पुण्य पुरस्कार' तसेच जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या रौप्य महोत्सवानिमित्त कै. अनंत भालेराव स्मृती पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला.या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री प्रताप सरनाईक होते.

यावेळी माजी खासदार रवींद्र गायकवाड,माजी आमदार ज्ञानराज चौगुले,जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर,नगराध्यक्ष नेहा काकडे,पत्रकार संघाचे अध्यक्ष धनंजय रणदिवे,सरचिटणीस संतोष जाधव,सहसरचिटणीस राजाभाऊ वैद्य,कोषाध्यक्ष संतोष हंबीरे, उपाध्यक्ष श्रीकांत कदम व अब्बास सय्यद यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपमुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात घेतलेले ५६७ निर्णय हे सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी होते.'लाडकी बहीण' योजनेला सुरुवातीला विरोध झाला,मात्र ही योजना सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.केंद्र सरकारच्या शेतकरी सन्मान योजनेत राज्य सरकारने अतिरिक्त सहा हजार रुपयांची भर घातली असून, एनडीआरएफपेक्षा दुप्पट नुकसानभरपाई देण्याचा निर्णयही घेतला.आपत्तीग्रस्तांना दिवाळीपूर्वीच ३२ हजार कोटी रुपयांची मदत वितरित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.'शासन आपल्या दारी' या उपक्रमातून नागरिकांना थेट सेवा देण्यात आल्याचा उल्लेखही त्यांनी केला.

माझी नाळ सर्वसामान्य जनतेशी जोडलेली आहे,असे सांगत शिंदे यांनी मराठवाड्यातील दुष्काळ कायमचा दूर करण्याचा संकल्प व्यक्त केला.मराठवाडा




वॉटर ग्रीड प्रकल्पाद्वारे हा प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मंदिराच्या विकासासाठी १८६८ कोटी रुपयांच्या आराखड्याची तरतूद करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते तुळजाभवानी देवी तसेच दैनिक 'पुण्य नगरी'चे संस्थापक संपादक कै.मुरलीधरआप्पा शिंगोटे आणि कै.अनंत भालेराव यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

यावेळी विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल मान्यवरांना 'पुण्य पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. सहकार क्षेत्रातील कार्यासाठी हभप वसंतराव नागदे,उद्योग क्षेत्रातील योगदानासाठी ड.व्यंकटराव गुंड, वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रासाठी डॉ. दिग्गज दापके-देशमुख,महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या अर्चना माने,शिक्षण क्षेत्रातील कार्यासाठी बाळासाहेब जमाले,व्यसनमुक्ती कार्यासाठी डॉ. संदीप तांबारे,शेती व उद्योग क्षेत्रातील प्रगतीसाठी हणमंत गवळी व विठ्ठल चौधरी तसेच आदर्श सरपंच म्हणून अमर सूर्यवंशी यांचा सन्मान करण्यात आला.

तसेच कै.अनंत भालेराव स्मृती पत्रकारिता पुरस्कार विविध गटांतील विजेत्यांना प्रदान करण्यात आले. शोधवार्ता गटात बालाजी वडजे प्रथम,अमोल मुळे द्वितीय,राजहंस कांबळे व रोशन मुल्ला तृतीय तर विशेष वार्ता गटात माधव आटकोटे प्रथम,रमेश कदम द्वितीय,दिपक बारकुल व डॉ.रविंद्र भताने तृतीय ठरले.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने झाली.प्रास्ताविक पत्रकार संघाचे अध्यक्ष धनंजय रणदिवे यांनी केले तर सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन भैरवनाथ कानडे यांनी केले. कार्यक्रमाला पत्रकार बांधवांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## जयंती उत्सवात प्लाझ्मा व लेझर लाईटला निर्बंध नागरिकांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाचा निर्णय

धाराशिव, (जिमाका) जिल्ह्यात दिनांक १४ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी होणार असून,डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त ३० एप्रिलपर्यंत विविध पक्ष,संघटना व मंडळांकडून मिरवणुका,रॅली व शोभायात्रांचे आयोजन करण्यात येत आहे.

या मिरवणुका व रॅलीदरम्यान आयोजकांकडून प्लाझ्मा,बीम लाईट व लेझर बीम लाईटचा मोठ्या प्रमाणात वापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.मात्र या प्रखर प्रकाशामुळे मिरवणुकीत सहभागी होणारे तसेच ती पाहण्यासाठी उपस्थित असलेले लहान मुले, वयोवृद्ध,ज्येष्ठ नागरिक व सर्वसामान्य नागरिक यांच्या डोळ्यांना इजा होऊन त्यांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो.याचबरोबर,अशा तीव्र प्रकाशामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनचालकांचे नियंत्रण सुटून अपघात होण्याची शक्यता असून, त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही निर्माण होऊ शकतो.

या पार्श्वभूमीवर,दिनांक ३० एप्रिल २०२६ पर्यंत साजऱ्या होणाऱ्या जयंती उत्सवांच्या अनुषंगाने प्लाझ्मा,बीम लाईट व लेझर बीम लाईटचा वापर टाळावा,यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत संपूर्ण जिल्ह्यात निर्बंध आदेश लागू करण्यात आले आहे.भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३(१) नुसार,नागरिकांच्या जीवितास किंवा आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्यास तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची तरतूद आहे.

त्या अनुषंगाने जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव शांततेत पार पडावा आणि कायदा सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. नागरिकांच्या डोळ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मिरवणुका,रॅली व शोभायात्रांमध्ये प्लाझ्मा,बीम लाईट व लेझर बीम लाईटचा वापर कटाक्षाने टाळणे आवश्यक असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे.

त्यानुसार,भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये ३० एप्रिलपर्यंत जिल्ह्यातील सर्व मिरवणुका,रॅली व शोभायात्रांमध्ये प्लाझ्मा,बीम लाईट व लेझर बीम लाईटचा वापर करण्यास निर्बंध लागू करण्यात आले असल्याची माहिती अपर जिल्हादंडाधिकाऱ्यांनी यांनी दिली.

### सोलार मोटार ५ एचपी ची व स्टार्टरची चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सिंधुबाई वैजीनाथ आवटे, वय ७० वर्षे, रा.मस्सा खं ता. कळंब जि. धाराशिव यांची अंदाजे २३,००० किंमतीचे सोलार मोटार ५ एचपी ची व स्टार्टर हा दि.०७.०४.२०२६ रोजी मस्सा शिवारातील शेत गट नं ४३० मधून अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सिंधुबाई आवटे यांनी दि.११.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहे.




## क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त अभिवादन; वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन

**धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, धाराशिव जिल्ह्याच्या वतीने महात्मा फुले चौक येथे फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करून मानवंदना देण्यात आली.

यावेळी फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त (द्विशताब्दी वर्ष) संपूर्ण वर्षभर विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन जाहीर करण्यात आले. गाव व शहरांमध्ये फेऱ्या काढून फुले यांच्या विचारांचा प्रसार करण्यात येणार असून निबंध, वक्तृत्व, एकपात्री नाट्य, कविता वाचन तसेच फुले लिखित साहित्याचे अखंड वाचन अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाणार आहे.



तसेच सावित्रीबाई फुले व फुले यांच्या जीवनावर आधारित भित्तिपत्रक, चित्रकला व रील स्पर्धाही घेण्यात येणार आहेत. यासोबतच रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे, समतेच्या विचारांवर आधारित नाट्यप्रयोग, सत्यशोधक विवाह सोहळे तसेच फुले-शाहू-आंबेडकर यांच्या साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. कवी संमेलन व परिसंवादाद्वारे समाजप्रबोधनाचे कार्यक्रम वर्षभर राबवून ग्रामीण व शहरी भागात समतेचा विचार पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमास विभागीय अध्यक्ष आबासाहेब खोत, जिल्हाप्रमुख बिभीषण खुणे, भूम तालुका अध्यक्ष संतोष डोरले, धाराशिव तालुका अध्यक्ष व्यंकट जाधव, परंडा तालुका अध्यक्ष सुरेंद्र भोजने यांच्यासह सरपंच महालिंग राऊत, राजाभाऊ तळेकर, दादा कारकर, भारत जाधव, शांतीलाल वाघे, माजी सरपंच विष्णू इतापे, अनुदेव मारकड, सुनील भोसले, सुरेंद्र भोसले, आशिष माने, गोरख खुणे, राजेंद्र जाधव, गौतम वाघमारे, सरपंच मेत्रे, बालाजी गोरे, दगडू रामचंद्र मदने, देवानंद विठ्ठल रूपदास, मोहन काकडे, तुषार जाधव, अनिल जाधव, नंदकिशोर कुऱ्हाडे आदी उपस्थित होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## डॉ. बाबासाहेबांच्या विचाराने चालावे लागेल

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सर्वजनच आदराने वंदन करतात. डॉ. आंबेडकर यांच्याकडे अफाट बुद्धीमत्ता होती, त्यामुळे त्यांच्यापुढे नतमस्तक व्हावे लागते. विचार केला तर भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले. त्याच सुमारास भारताच्या स्वातंत्र्य लढ्यापासून प्रेरणा घेऊन आशिया आणि आफ्रिका खंडातील काही देशात स्वातंत्र्याचे लढे संघटीत झाले आणि त्यातल्या काही देशांनी स्वातंत्र्य मिळविले, युरोपीय देशांच्या वसाहत वादातून काहींनी सुटका करून घेतली. काही देशांची सुटका तशी झाली नाही परंतु तिथे लोकशाही स्वातंत्र्याचे वारे वहायला तरी लागले. अशा विसाव्या शतकाच्या पाचव्या आणि सहाव्या दशकामध्ये स्वतंत्र झालेल्या देशातील स्वातंत्र्याचे आणि लोकशाहीचे पुढे काय झाले याचा इतिहास सर्वांना माहीत आहे. पाकिस्तानात लोकशाही दिसून येत नाही, बांगलादेशात तिचे धिंडवडे निघाले, ब्रम्हदेशात तर सलग चाळीस वर्षात लष्करी सत्ता राहिली आणि अनेक देशांतले स्वातंत्र्य संपुष्टात येऊन तिथे हुकूमशहांच्या राजवटी आल्या. भारतात मात्र १९७५ ते ७७ या कालावधीतील आणीबाणी वगळता लोकशाही टिकून राहिली आहे आणि या देशांतल्या लोकांना शांततापूर्ण मार्गाने आपले हित करून घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. हे सगळे देश वसाहत वादाच्या कचाट्यातून मुक्त झाल्यानंतर त्यांनी प्रगतीची वाट चोखाळावी अशी अपेक्षा होती परंतु काही अपवाद वगळता भारताशिवाय कोठेही स्वातंत्र्याचा हा हेतू साध्य झालेला नाही. भारतामध्ये हे साध्य होण्यामागे भारतीयांच्या परंपरा, विशिष्ट मनोप्रवृत्ती आणि या देशाला लाभलेले नेतृत्व या गोष्टी आहेत हे तर कोणी नाकारू शकणार नाही. परंतु या स्थैर्यामागे आणि प्रगतीमागे भारताची घटनासुध्दा उभी आहे आणि ती तयार करण्याचे श्रेय बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे जात असल्याने आपण बिनदिक्कतपणे असे म्हणू शकतो की भारताच्या स्थैर्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सिंहाचा वाटा आहे. परंतु ज्या भारताच्या जडणघडणीमध्ये डॉ. आंबेडकरांचा सिंहाचा वाटा आहे हे कदापी विसरता येणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय घटनेचे शिल्पकार आहेत आणि घटना तयार होताना तिच्या जडणघडणीत तसेच तिचा मसुदा तयार करण्यात त्यांनी सर्वाधिक कष्ट घेतलेले आहेत. शेवटी कोणताही समाज कसा चालावा हे कायद्यावरून ठरत असते आणि भारतीय घटनेने आधुनिक कायदे दिलेले आहेत. आता आपल्या देशाचे जे विकासगामी चित्र निर्माण झालेले आहे ते करण्याची तरतूद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या घटनेत केली आहे. त्यामुळे हे शक्य झालेले आहे. सुमारे एक हजार वर्षे लहान-मोठ्या लढाया आणि सततचा रक्तपात यामुळे सामाजिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रांमध्ये अस्थिरता माजलेल्या या देशाचे आताचे जे चित्र आहे ते त्या हजार वर्षांच्या इतिहासाच्या तुलनेत तपासून पाहिले तर असे लक्षात येते की, भारताची आता होत असलेली जडणघडण ही सावकाशीने झालेली पण एक क्रांती आहे. हजार वर्षाची अस्थिरता, राजेशाही, त्यानंतरची इंग्रजांची गुलामगिरी यानंतर स्वतंत्र झालेला हा देश नेमका कोणत्या राज्यपद्धतीने चालावा याचा निर्णय करणे ही काही सोपी गोष्ट नव्हती. या देशातल्या राजकीय परंपरा, लोकांची मनःस्थिती, सामाजिक स्थिती, इतिहास या सगळ्यांचा सखोल अभ्यास करून या देशाला कोणत्या प्रकारची राज्यपद्धती योग्य ठरेल याचा निर्णय या नेत्यांनी केला आणि त्याचे सारे कायदेशीर तपशील डॉ. आंबेडकरांनी आपली विद्वत्ता पणाला लावून घटनेमध्ये शब्दबद्ध केले. भारताच्या राजकीय स्थैर्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या दोन देणग्या प्रामुख्याने कारणीभूत ठरल्या आहेत. त्यातली पहिली देणगी आहे लोकशाहीतील विविध यंत्रणांचे अधिकार आणि त्यांचे परस्परांवरील नियंत्रण होय. देशाचा कारभार तीन स्तंभांवर आधारलेला आहे. संसद, न्यायपालिका आणि कार्यपालिका. यातली संसद सर्वात श्रेष्ठ आहेच कारण ती जनतेने निवडून दिलेली आहे मात्र न्यायपालिका आणि कार्यपालिका यांनासुध्दा भारतीय घटनने तेवढेच महत्त्वाचे अधिकार दिलेले आहेत. या तिघांच्या अधिकाराचा कोठेही टकराव होऊ नये यासाठी या तीन यंत्रणांचे संबंध कसे असावेत याबाबत आपल्या घटनेत जे नियम केलेले आहेत. ते नियम फार विचारपूर्वक केलेले असल्यामुळेच आपली लोकशाही टिकलेली आहे. त्यातल्या प्रत्येकाला आपले स्वायत्त अधिकार राबविण्याची मुभा दिली. परंतु त्यातला कोणताही घटक आपल्या स्वायत्त अधिकारामध्ये एकाधिकार गाजवू शकणार नाही, अशीही नियंत्रणे त्याच्यावर ठेवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला एक संदेश दिला तो म्हणजे. शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शिकले पाहिजे. शिकल्याशिवाय लोकशाहीने आपणांस दिलेले अधिकार कळणार नाहीत. आपला हक्क, अधिकार कळण्यासाठी तो मागण्यासाठी शिकले पाहिजे. त्यामुळे पहिल्यांदा आपण व आपला परिवार शिकला पाहिजे, ज्ञानी बनला पाहिजे. शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे जो पिईल तो गुरगुरायाला लागेल असे विचार डॉ. बाबासाहेबांनी व्यक्त केले. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाचा आग्रह पहिल्यांदा धरला. आज आपल्या देशात शिक्षणाचे वाढते प्रमाण ही डॉ. बाबासाहेबांची देन आहे हे लक्षात घेतले पाहिजे. डॉ. बाबासाहेबांचे विचार व त्यांचे कार्य सतत आठवणीत ठेवले पाहिजेत. काही झाले तरी प्रगती व विकासासाठी त्यांची आठवण ठेवली पाहिजेत. घटना लिहीणे मोठे आवघड काम होते. आज भारतीय लोकशाही मजबुत स्थितीत दिसते याला कारण मजबुत घटना आहे. इतर देशातील घटना व आपल्यादेशातील जनतेच्या योग्यता अशा अनेक सर्व बाजूचा विचार करून त्यांनी केलेले काय महान आहे. त्यांच्या जन्मदिनी विचार करून, त्यांनी दाखविलेल्या मार्गानुसार चालावे लागणार आहे. यासाठी भारतीय प्रत्येक कुटुंब हे साक्षर झाले पाहिजे. निरक्षर कोणीही राहाता कामा नये. आपले पाल्य शाळेत घालणे व त्याला त्याच्या अधिकाराची जाण करून देण्याचे काम केले पाहिजे. डॉ. बाबासाहेबांच्या विचाराने चालाणे व सतत डोळ्यासमोर ठेवावे लागेल. हीच जन्मदिनी संदेश!

# बाबासाहेबांचे संविधान म्हणजे... एकसंघ भारताची पोलादी चौकट

**१४ एप्रिल हा दिवस भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील प्रेरणादायी पर्व आहे. या दिवशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती देशभर मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. महाराष्ट्र शासन तसेच देशातील विविध संस्थांकडून त्यांच्या कार्याचा गौरव करणारे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. विश्वरत्न, भारतरत्न, घटनाकार'' आणि भारत भाग्यविधाता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून विविधतेने नटलेल्या भारताला एकसंघ राष्ट्र म्हणून बांधून ठेवण्याचे ऐतिहासिक कार्य केले. त्यामुळेच त्यांच्या जयंती दिनी संपूर्ण देशात त्यांना आदरांजली व्यक्त केली जाते. काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंतची जनता आजच्या दिवशी महामानवापुढे नतमस्तक होते.**



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेले संविधान व त्यावर आधारित लोकशाही जोपर्यंत भारतात आहे, एकसंघ भारतासाठी कायद्याची पोलादी चौकट कायम आहे.त्यांना आदरांजली व्यक्त करताना संविधानाच्या स्वरुपात बाबासाहेबांनी दिलेल्या समानतेच्या,न्यायाच्या आणि बंधुतेच्या धाग्यात सर्व भारतीयांना गुंफण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे.

**राष्ट्र प्रथम बाबासाहेबांचा दृष्टिकोन**

बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका स्पष्ट होती. संविधान सभेत बोलताना ते म्हणाले होते, ''राष्ट्र प्रथम, समाज नंतर आणि व्यक्ती त्यानंतर.'' स्वतः आयुष्यभर सामाजिक अन्याय सहन करूनही त्यांनी कधीही कोणाबद्दल सूडाची भावना बाळगली नाही. उलट, त्यांनी अशी राज्यघटना निर्माण केली ज्यामध्ये प्रत्येक नागरिकाला समान न्याय मिळेल.

आचार्य प्र. के. अत्रे यांनी बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर लिहिलेल्या आपल्या आदरांजलीत आंबेडकरांना ''जुलूमाविरुद्ध उगारलेली वज्राची मुठ'' असे संबोधले आहे. ही उपमा त्यांच्या संघर्षशील वृत्तीचे आणि अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे अचूक चित्रण करते.

**भारताच्या अखंडतेची शाश्वती**

स्वातंत्र्यानंतर भारत एकसंघ राहील का याबाबत अनेक पाश्चिमात्य नेत्यांना शंका होती. विविध धर्म, भाषा, जाती यामुळे भारताचे विभाजन होईल, असे भाकीत केले जात होते. विस्टन चर्चिल यांसारख्या नेत्यांनी भारताच्या एकात्मतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.जगातील अनेक नेत्यांनी हा खंडप्राय देश एकत्र राहणार नाही,असे भाकीत केले होते. पाकिस्तानच्या फाळणीनंतर पश्चिम आशिया खंडात धर्माच्या नावावर झालेली अमानुष मानवी कत्तल जगाच्या पुढे होती. भारतातील विविधता, विविध धर्मांचे लोक,धर्मावरून झालेली विभागणी हे मोठे उदाहरण पुढे होते. त्यामुळे भारताचे भविष्य अंधकारमय वाटणे तत्कालीन परिस्थितीला धरून होते.मात्र बाबासाहेबांनी अभ्यासाअंती यावर रामबाण उपाय शोधून काढला. ते म्हणजे संविधान, आपली राज्यघटना. संविधान सभेपुढील भाषणात ते म्हणाले होते,स्वातंत्र्य आणि समानता ही मूल्ये बंधूतेशिवाय टिकू शकत नाही.राजकीय लोकशाही यशस्वी तेव्हाच होईल जेव्हा सामाजिक लोकशाही अस्तित्वात असेल.त्यामुळे आजचा दिवस सामाजिक लोकशाही बळकट करण्याचा देखील आहे.भारतीय संविधान सामाजिक आर्थिक, राजकीय,समानता देण्याच्या दृष्टीने अतिशय श्रेष्ठ दर्जाचे दस्तावैज आहे.

**संविधानातील कलम;एकात्मतेचा कणा**

आपण बघतो, भाषा, प्रांत,जाती,अस्मिता यावरून देशात आजही अनेक आंदोलने सुरू असतात, विविध संघटना आणि राजकीय पक्ष आपापल्या भूमिका मांडत असतात. संविधानाचे वैशिष्ट्य म्हणजे संविधान भाषा,प्रांत,जाती,अस्मिता यांचे अस्तित्व मान्य करते.मात्र सोबतच राष्ट्रापुढे सर्व बाबी गौण ठरवते.विधिमंडळ,कार्यपालिका, न्यायपालिका,माध्यमे अशा सर्व स्तंभांना त्यांनी परस्पर पूरक उभे केले आहे. त्यामुळे भारतीय राज्यघटनेला पुढे ठेवूनच सर्व घटकांना आपली वाटचाल करावी लागते.''भारतीय संसद, न्यायपालिका आणि कार्यपालिका या एकमेकांवर नियंत्रण व संतुलन ठेवतात. कार्यपालिका राज्यघटनेनुसार प्रशासन करते, आणि या सर्वांवर माध्यमे व जनतेचे लक्ष राहते. जबाबदारीची,कार्यवाहनाची,जाणिवांची आणि दायित्वाची अशी मजबूत पोलादी साखळी घटनेच्या माध्यमातून निर्माण झाली आहे. त्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहेत भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार. या मूलभूत अधिकारांनी स्पष्ट बजावले आहे की या मूलभूत अधिकारांनी स्पष्ट केले,

'हा देश हा अस्मितेवर नव्हे,भावनेवर नव्हे तर सर्वसंमतीवर चालेल.'

शोषित,वंचित,गरीब मागास सर्व घटकांना समतोल विकासाची संधी मिळणे व त्यांच्या न्याय्य हक्काचे रक्षण होणे किती आवश्यक आहे हे बाबासाहेबांना माहिती होते. त्यामुळेच त्यांनी घटनेमध्ये मूलभूत अधिकार सुस्पष्टपणे अंतर्भूत केले.या अधिकारामुळे कायद्यापुढे सर्व समान आणि सर्वांना कायद्याचे संरक्षण मिळाले आहे.

**समानतेचा अधिकार (कलम १४ ते १८)**

बाबासाहेब आंबेडकरांनी मूलभूत अधिकारांमध्ये १४ ते १८ या कलमांमध्ये सर्व नागरिक कायद्यापुढे समान असतील, जात, धर्म, वंश,लिंग किंवा जन्मस्थानावरून भेदभावास मनाई,अस्पृश्यता अमान्य,आणि नियुक्तीची समान संधी,तसेच देशाप्रतीची बांधीलकी या बाबी नमूद केल्या. एका सामान्य स्त्री-पुरुषाला देशाचा प्रधानमंत्री, राष्ट्रपती बनण्याचा अधिकार देतानाच भेदभावाला त्यांनी या समानतेच्या अधिकाराने कायदेशीर बंधन घातले आहे.

**स्वातंत्र्याचा अधिकार (कलम १९ ते २२)**

ज्यांना हजारो वर्ष शिक्षण, वाणी, अधिकार आणि सहभागांपासून जाती धर्माच्या आधारावर संधी नाकारली गेली. त्या सर्वांना स्वतंत्र भारतात अभिव्यक्ती स्वातंत्र्य देण्याचे कार्य बाबासाहेबांमुळे झाले. राज्यघटनेतील कलम १९ प्रत्येक भारतीयाला भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार देते.भारताचा नागरिक कोणत्याही राज्यामध्ये मुक्त संचार करू शकतो. भारताच्या कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचा अधिकार त्याला मिळालेला आहे.जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संरक्षण,शिक्षणाचा हक्क,न्यायालयात दाद मागण्याचा हक्क,विनाकारण स्थानबद्ध न करण्याचा हक्क अशा अनेक मूलभूत हक्कांची तरतूद करण्यात आली आहे.

**शोषणाविरुद्ध संरक्षण (कलम २३-२४)**

हजारो वर्षाची वेठबिगारी, सालदारी, बिनपगारी शोषणाला बळी पडलेल्या शोषितांना थेट घटनेच्या माध्यमातूनच बाबासाहेबांनी न्याय दिला. भारतीय राज्यघटनेच्या कलम २३ आणि २४ मध्ये शोषणाविरुद्ध संरक्षण दिले आहे.या कायद्यामुळे स्वतंत्र भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळात माणसांना गुलाम ठेवणे, वेठबिगारी सारखे काम करुन घेणे, बिनपगारी सालदारी करणे, सक्तीने सेवा करायला सांगणे, धर्म, वंश, जात यावरुन काम करुन घेणे, बळजबरीची मजुरी करुन घेणे, १४ वर्षाखालील कोणत्याही बालकाकडून काम करुन घेणे, अर्थात बालमजुरीवर बंदी घालण्यात आली.ही फार मोठी क्रांती होती आणि याचा कायदा बनल्यामुळे हजारो सालाच्या गुलामगिरीतून मागासवर्गीयांची, शोषितांची मुक्तता झाली.

**धर्मस्वातंत्र्य (कलम २५ ते २८)**

धार्मिक चालीरीती व रुढीपरंपरांच्या नावावर शतकानुशतके चाललेल्या शोषणाला घटना लागू झाल्यानंतर कायद्याच्या चौकटीने कायमचा पायबंद बसला. सोबतच सर्वांना आपापला धर्म पाळण्याची मुभा देण्यात आली. मात्र सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता आणि आरोग्याला घातक नसेल अशा वर्तनाची हमी कायद्याने घेण्यात आली. प्रत्येक धर्माला धार्मिक विधी, धार्मिक व्यवहाराची व्यवस्था, सांस्कृतिक शैक्षणिक हक्क प्रदान करण्यात आले.धार्मिक शिक्षण, धार्मिक उपासनेचे स्वातंत्र्य मिळाले. भारतातील विविध जातीधर्मांच्या लोकांना राज्यघटनेने हे स्वातंत्र्य सार्वजनिक सुव्यवस्थेच्या अधीन राहून पाळण्याचे अधिकार या कलमाने दिले. भारतीय समाजावर असणारा धर्माचा,धार्मिक चालीरीतींचा पगडा, याचा अभ्यास करून बाबासाहेबांनी मूलभूत हक्कांमध्ये हे स्वातंत्र्य बहाल केले आहे. यासोबतच त्यांनी कलम २९,३० अन्वये अल्पसंख्याकांना सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार आपली भाषा व संस्कृती जपण्याचा अधिकार दिला आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतातला कोणताही नागरिक त्याच्यावरील अन्यायासाठी कलम ३२ अन्वये हक्कांचे संरक्षण करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे.

**सर्वांसाठी न्याय व्यापक दृष्टी**

बाबासाहेब स्वतः वंचित समाजातून आले होते, पण त्यांनी फक्त मागासवर्गीयांसाठी नव्हे तर सर्व समाजासाठी न्याय व्यवस्था उभी केली. अनुसूचित जाती-जमातींसाठी आरक्षण, समान संधी,सामाजिक न्यायासाठी कायदेशीर संरक्षण त्यांनी दिले. सोबतच कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही याची पूर्ण काळजी घेतली.

**संविधान सभेला दिलेले तीन इशारे**

संविधान सभेच्या निर्मितीत अनेक महान नेत्यांचे, मान्यवरांचा हातभार होता. मात्र तरीही बाबासाहेबांनाच घटनेचे शिल्पकार संबोधले जाते. कारण, त्यांनी घटनेच्या अंमलबजावणीची दिशा आणि सूत्रे स्पष्टपणे अधोरेखित केली. त्यांची संविधान सभेतील भाषणेही तेवढी बोलकी आहेत. भारतीय संविधान सामाजिक, आर्थिक, राजकीय, समानता देण्याच्या दृष्टीने अतिशय उत्तम अशी घटना आहे मात्र या घटनेचा वापर कोण करणार ? कसा करणार ? आणि किती प्रामाणिकपणे करणार ? यावरच घटनेच्या अंमलबजावणीचे फलित अवलंबून असेल असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी घटना निर्माण करणाऱ्या संविधान सभेपुढे बोलताना तीन महत्त्वाचे इशारे दिले होते...

ते म्हणाले होते,देशातील सामाजिक असमानता दूर होणे आवश्यक आहे.आम्ही सर्वप्रथम भारतीय होणे आवश्यक आहे. त्यांनी परस्पर बंधुतेवर भर दिला.बंधुता म्हणजे राष्ट्रातील सर्व लोकांमध्ये बंधूभाव आणि एकतेची भावना निर्माण करणे होय.

त्यांनी दुसरा इशारा दिला होता आर्थिक विषमतेचा. देशातील सर्व नागरिकांचा समतोल आर्थिक विकास होणे आवश्यक आहे, कारण आर्थिक विषमता श्रीमंत-गरीब दरी वाढवते. ही दरी वाढली तर असंतोष वाढेल.

त्यांचा तिसरा इशारा होता. सांप्रदायिकता वाढायला नको. सांप्रदायिकता म्हणजे विशिष्ट धर्माला अधिक महत्त्व देणे. भारत हा विविध धर्मांचा देश आहे.कोणत्याही धर्माचा द्वेष, वाढायला नको. धर्माधारित द्वेष राष्ट्राच्या एकात्मतेला तडा देईल. हे इशारे आजही तितकेच महत्त्वाचे आहेत.

**घटना निर्मिती राष्ट्रनिर्मितीचा पाया**

भारतीय राज्यघटना ही केवळ कायद्यांचा संच नाही, तर त्यात राष्ट्रनिर्मितीचा स्वयंस्पष्ट आराखडा आहे. बाबासाहेबांनी घटनेच्या माध्यमातून संघराज्य व्यवस्था मजबूत केली केंद्र आणि राज्य यांच्यात संतुलन ठेवले. न्यायव्यवस्थेला स्वातंत्र्य दिले.यामुळे भारत एक अखंड आणि सक्षम राष्ट्र बनला.

संविधान टिकले तर लोकशाही टिकेल

महामानवाला अभिवादन करताना प्रत्येक भारतीयाने ही शपथ घेणे गरजेचे आहे की, संविधान टिकले तर लोकशाही टिकेल. आणि राजकीय लोकशाही तेव्हाच टिकेल जेव्हा सामाजिक लोकशाही अस्तित्वात असेल. आपण संविधानाच्या अमृत महोत्सवी काळात आहोत. या पार्श्वभूमीवर प्रत्येक भारतीयाने संविधान समजून घेणे आवश्यक आहे.संविधानाचे पालन करणे आवश्यक आहे.आपल्या अधिकारांसोबत भारताचा नागरिक म्हणून आपली कर्तव्येही ओळखणे आवश्यक आहे. बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून एकसंघ, न्याय्य आणि प्रगत भारत उभा केला. जगाला वाटत होते की भारत टिकणार नाही, पण आज भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे,जगातील महाशक्ती म्हणून उदयास येत आहे. हे त्यांच्या दूरदृष्टीचे फलित आहे.

१४ एप्रिलच्या त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्यापुढे नतमस्तक होताना... चला भारतीय म्हणून आपण एकच संकल्प करुया...संविधानाचा सन्मान करुया, समानतेचे,बंधुत्वाचे मूल्य जपूया सर्वप्रथम एक भारतीय बनूया आणि एकसंघ भारत अधिक मजबूत करुया... हीच महामानव बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**
**९७०२८५८७७७**

## लेक लाडकी योजना: मुलींच्या सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासनाचे महत्त्वपूर्ण पाऊल

मुलींच्या जन्माचे स्वागत व्हावे, त्यांचा सन्मान वाढावा आणि त्यांना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने लेक लाडकी योजना १ एप्रिल २०२३ पासून कार्यान्वित केली आहे. ही योजना केवळ आर्थिक मदत नसून मुलींच्या सक्षमीकरणाचा आणि सामाजिक परिवर्तनाचा एक भक्कम आधार ठरत आहे. आतापर्यंत लातूर जिल्ह्यातील १० हजार २६ मुलींना या योजनेचा लाभ मजूर करण्यात आला आहे.

राज्यातील स्त्री जन्मदर वाढविणे आणि मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देणे हे या योजनेचे प्राथमिक ध्येय आहे. यासोबतच ग्रामीण व शहरी भागातील बालविवाहाची प्रथा रोखणे, मुलींच्या मृत्यूदरात घट करणे आणि त्यांना कुपोषणाच्या विळख्यातून बाहेर काढणे यावर राज्य शासनाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. मुलींना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवून त्यांच्या उज्वल भविष्याची पायाभरणी करणे हा या योजनेचा व्यापक दृष्टिकोन आहे.

१ एप्रिल २०२३ रोजी किंवा त्यानंतर जन्माला आलेल्या मुलीला लेक लाडकी योजनेचा लाभ दिला जातो. एका कुटुंबातील पहिल्या दोन मुलींना या योजनेचा लाभ घेता येतो. जर एखाद्या कुटुंबाला पहिले अपत्य मुलगा आणि दुसरे मुलगी असेल, तर त्या मुलीला या योजनेचा लाभ दिला जातो. यासाठी लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. तसेच, दुसऱ्या अपत्याच्या वेळी अर्ज करताना माता किंवा पित्याने कुटुंब नियोजन प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

**लाभाचे टप्पे आणि स्वरूप**

'लेक लाडकी' योजना पिवळ्या आणि केशरी रेशनकार्डधारक कुटुंबांसाठी अत्यंत लाभदायी ठरत आहे. पात्र कुटुंबातील मुलीला जन्मापासून ती १८ वर्षांची होईपर्यंत विविध पाच टप्प्यांत एकूण १ लाख १ हजार रुपयांचे अर्थसाहाय्य थेट बँक खात्यात दिले जाते. योजनेचे नियोजन अतिशय सूत्रबद्ध पद्धतीने करण्यात आले आहे: मुलीच्या जन्माचा आनंद द्विगुणित करण्यासाठी पहिल्या टप्प्यात ५ हजार रुपये दिले जातात. मुलगी पहिल्या इयत्तेत प्रवेश घेते, तेव्हा ६ हजार रुपयांचे सहाय्य केले जाते. तिने सहावीत प्रवेश घेतल्यावर ७ हजार रुपयांचा लाभ दिला जातो. मुलगी अकरावीत गेल्यानंतर तिच्या शैक्षणिक खर्चासाठी ८ हजार रुपये दिले जातात आणि मुलीने वयाची १८ वर्षे पूर्ण केल्यानंतर तिला ७५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य मिळते, ज्यामुळे तिला पुढील उच्च शिक्षण किंवा करिअरसाठी मोठी मदत होते.

**आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज प्रक्रिया**

लेक लाडकी योजनेचा लाभ घेण्याकरिता लाभार्थी मुलीचा जन्म दाखला, कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाचा तहसीलदार किंवा सक्षम अधिकाऱ्याचा दाखला, लाभार्थी व पालकांचे आधार कार्ड, बँक पासबुकची छायांकित प्रत आणि पिवळे किंवा केशरी रेशनकार्ड ही कागदपत्रे आवश्यक आहेत. मुलीने १८ वर्षे पूर्ण केल्यानंतर अंतिम लाभ मिळवण्यासाठी ती अविवाहित असणे आणि तिचे नाव मतदार यादीत असणे गरजेचे आहे. अधिक माहितीसाठी अंगणवाडी सेविका, मुख्य सेविका आणि प्रकल्प स्तरावर एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याशी संपर्क साधता येईल.

**संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, लातूर**

०००००००००००००००००००००००

## 'सशक्त महिला समृद्ध महाराष्ट्र : संधी, स्वावलंबन आणि समानतेचा नवा प्रवास'




महिला सक्षमीकरण हा केवळ एक विचार किंवा घोषवाक्य नसून,तो समाजाच्या सर्वांगीण प्रगतीचा मूलमंत्र आहे.बदलत्या काळात स्त्रीची भूमिका केवळ कुटुंबापुरती मर्यादित राहिलेली नाही; ती शिक्षण, उद्योग,प्रशासन,विज्ञान आणि नेतृत्व अशा विविध क्षेत्रांमध्ये आपले स्थान निर्माण करत आहे. त्यामुळे महिलांना संधी,सुरक्षा आणि समान हक्क देणे ही केवळ गरज नसून समाजाची जबाबदारी बनली आहे. आजच्या युगात सक्षमीकरणाचा अर्थ अधिक व्यापक झाला आहे. स्त्रीला स्वतःचे निर्णय घेण्याची मुभा,आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याची ताकद,शिक्षणाची समान संधी आणि सुरक्षित वातावरण मिळणे ही त्याची मूलभूत तत्त्वे आहेत.या सर्व घटकांचा समतोल साधल्याशिवाय खरी प्रगती शक्य नाही.

महिलांच्या प्रगतीसाठी शिक्षण हा सर्वात महत्त्वाचा पाया मानला जातो.मुलींना शालेय तसेच उच्च शिक्षणाबरोबरच तांत्रिक आणि कौशल्याधारित प्रशिक्षण मिळणे अत्यावश्यक आहे.डिजिटल युगात संगणक ज्ञान,ऑनलाईन सेवा वापरण्याची क्षमता आणि संवादकौशल्य यामुळे स्त्रिया अधिक सक्षम बनत आहेत.शिक्षणामुळे आत्मविश्वास वाढतो आणि स्त्री स्वतःच्या आयुष्याचे निर्णय स्वतः घेऊ शकते.

आर्थिक स्वावलंबन हा सक्षमीकरणाचा केंद्रबिंदू आहे.महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन विविध योजना राबवत आहे.उमेद (महाराष्ट्र राज्य ग्रामीण आजीविका अभियान) अंतर्गत बचत गटांच्या माध्यमातून महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी मिळत आहेत. प्रधानमंत्री मुद्रा योजना आणि स्टँड-अप इंडिया योजना यांमुळे महिलांना उद्योग सुरू करण्यासाठी कर्ज आणि आर्थिक सहाय्य मिळत आहे.तसेच महाराष्ट्र राज्य महिला आर्थिक विकास महामंडळ () महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे ही सक्षमीकरणाची मूलभूत अट आहे.सुरक्षित मातृत्व,योग्य पोषण आणि आरोग्यसेवा सहज उपलब्ध व्हावी यासाठी शासनाने प्रधानमंत्री मातृ वंदना योजना,जननी सुरक्षा योजना यांसारख्या उपक्रमांची अंमलबजावणी केली आहे.यामुळे माता आणि बालकांच्या आरोग्यात सकारात्मक बदल होत आहे.

महिलांना सुरक्षित वातावरण देणे तितकेच महत्त्वाचे आहे.घरगुती हिंसा,छेडछाड आणि कार्यस्थळी होणारा भेदभाव यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदे आणि यंत्रणा कार्यरत आहेत.निर्भया फंड अंतर्गत विविध सुरक्षा उपाययोजना राबवल्या जात आहेत,तसेच महिला हेल्पलाईनसारख्या सुविधा महिलांना तातडीची मदत पुरवतात.स्त्री निर्भयपणे समाजात वावरू शकेल,असे वातावरण निर्माण करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. डिजिटल सक्षमीकरण हा आधुनिक काळातील एक महत्त्वाचा पैलू आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांमध्ये डिजिटल साक्षरता वाढवण्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जात आहेत. इंटरनेट,मोबाईल बँकिंग आणि ऑनलाईन सेवा यांचा वापर महिलांना अधिक स्वावलंबी बनवत आहे.

सामाजिक मानसिकतेत बदल घडवणे ही दीर्घकालीन पण अत्यंत गरजेची प्रक्रिया आहे.मुलगा-मुलगी भेदभाव,पारंपरिक बंधने आणि असमान जबाबदाऱ्या या विचारांपासून समाजाला मुक्त करणे आवश्यक आहे.घरगुती निर्णयांमध्ये महिलांचा सहभाग आणि पुरुषांचा समान वाटा यामुळे खऱ्या अर्थाने समतोल साधला जाऊ शकतो.

याशिवाय,महिलांचा राजकीय आणि नेतृत्व क्षेत्रातील सहभाग वाढवणेही तितकेच महत्त्वाचे आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना दिलेले आरक्षण हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.यामुळे महिलांना निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळते आणि त्यांच्या समस्या थेट धोरणांमध्ये प्रतिबिंबित होतात. महिला सक्षमीकरण ही केवळ एका घटकाची जबाबदारी नसून ती संपूर्ण समाजाची सामूहिक चळवळ आहे.स्त्री सक्षम झाली तर कुटुंब बळकट होते,कुटुंब मजबूत झाले तर समाज प्रगत होतो आणि समाज प्रगत झाला तर राष्ट्र समृद्ध होते. खऱ्या अर्थाने प्रगती तेव्हाच साध्य होईल, जेव्हा प्रत्येक महिला आत्मविश्वासाने निर्भयपणे आणि सन्मानाने आपले जीवन जगू शकेल. त्या दिशेने शासनाच्या योजना आणि समाजाचा सकारात्मक दृष्टिकोन यांचा संगमच एक सशक्त आणि समृद्ध महाराष्ट्र घडवू शकतो.

**- संकलन: जिल्हा माहिती कार्यालय, धाराशिव**

# बाबासाहेबांची परिवर्तनकारी शक्ती

## आज १४ एप्रिल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त...



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या परिवर्तनकारी कार्याचा विचार करताना सर्वप्रथम प्रकर्षाने जाणवते, ती त्यांच्या संघटनात्मक शक्तीची विलक्षण दूरदृष्टी. सामाजिक विषमता, अस्पृश्यता आणि आर्थिक शोषणाच्या गर्तेत अडकलेल्या वंचित समाजाला त्यांनी केवळ विचार दिले नाहीत, तर एकजुटीची मोठी ताकद दिली. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' ही त्यांची त्रिसूत्री आजही समाजपरिवर्तनाचा मूलमंत्र आहे.
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा वेध घेताना मन कृतज्ञतेने भारावून जाते. अन्याय, विषमता आणि अज्ञानाच्या अंधारात त्यांनी प्रज्ञेचा दीप प्रज्वलित केला. केवळ व्यक्ती म्हणून नव्हे, तर संपूर्ण समाजाला जागवणारी शक्ती म्हणून त्यांनी इतिहास घडवला. त्यांच्या कार्यातील सर्वात प्रभावी पैलू म्हणजे संघटनात्मक शक्तीची उभारणी. विखुरलेल्या समाजाला एकत्र आणून त्यांनी स्वाभिमान, संघर्ष आणि परिवर्तन यांची नवी दिशा दिली. त्यांच्या या परिवर्तनकारी शक्तीचा मागोवा घेणे म्हणजे समाजजागृतीच्या प्रवासाचा अर्थ समजून घेणे होय.
सामाजिक न्यायाची धगधगती मशाल घेऊन उभे राहणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ विचारवंत नव्हते, तर संघटनात्मक शक्तीचे अप्रतिम शिल्पकार होते. विषमता, अस्पृश्यता, अन्याय आणि उपेक्षा यांच्या अंधारात त्यांनी संघटनेच्या तेजस्वी दिव्याने प्रकाश पसरवला. संघटना म्हणजे केवळ लोकांचा समूह नव्हे, तर जागृत मनांची एकत्रित चेतना असल्याची जाणीव त्यांनी समाजात रुजवली. बहिष्कृत हितकारिणी सभा (१९२४), स्वतंत्र मजूर पक्ष (१९३६) आणि शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन (१९४२) यांसारख्या संस्थांद्वारे त्यांनी संघटनात्मक पायाभरणी केली. या संघटनांनी हजारो वंचितांना एकत्र आणले. त्यांच्या मनात स्वाभिमानाची ठिणगी पेटवली. यामुळे समाजातील विखुरलेपणा कमी झाला. संघटनेमुळे दुर्बल घटकांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे धाडस दाखवले. 'संघटनेशिवाय शक्ती नाही' हा संदेश त्यांनी कृतीतून दिला. सामूहिकतेच्या शक्तीने कोणतीही अडचण पार करता येते, हा विश्वास त्यांनी जनमानसात निर्माण केला. संघटनात्मक शक्तीच्या माध्यमातून त्यांनी व्यक्तीच्या अस्तित्वाला नवी ओळख दिली. संघटन हेच स्वाभिमानाचे खरे मूळ आहे आणि संघटनेमुळेच गुलामीतून स्वातंत्र्याकडे प्रवास सुरु होतो, हा अढळ विश्वास त्यांनी समाजमनात खोलवर रुजवला.

**संघटनात्मक शक्तीचे महत्त्व**

संघटन उभारण्याची प्रक्रिया त्यांनी मानसिक गुलामगिरी मोडून काढण्यापासून सुरू केली. आत्मसन्मान जागृत करणे हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' ही त्रिसूत्री त्यांनी समाजाला दिली. या त्रिसूत्रीमुळे विचारशक्ती, एकजूट आणि कृतीशीलता यांचा संगम घडला. महाडचा चवदार तळे सत्याग्रह (१९२७) हा संघटनात्मक शक्तीचा ऐतिहासिक नमुना ठरला. हजारो लोकांनी पाण्याच्या हक्कासाठी एकत्र येत अन्यायाला आव्हान दिले. नाशिकचा काळाराम मंदिर प्रवेश आंदोलन (१९३०) त्याच संघर्षाचे प्रतीक ठरले. या चळवळींनी संघटित जनशक्तीची ताकद शासनासमोर ठळक केली. सामूहिक कृतीमुळे सामाजिक बंधने सैल झाली. लोकांच्या मनातील भीती कमी झाली. संघटनेमुळे लोकांमध्ये परस्परविश्वास वाढला. संघर्षाला दिशा मिळाली. अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा मिळाली. 'हक्क मिळवायचे असतील, तर संघटित व्हा' हा त्यांचा स्पष्ट संदेश होता. सामूहिक जागृतीतूनच क्रांती जन्म घेते आणि संघटित समाजच इतिहास बदलण्याची ताकद निर्माण करतो, हा सिद्धांत त्यांनी कृतीतून जिवंत केला.

कामगार चळवळीला बळ–

आर्थिक क्षेत्रात संघटनात्मक शक्तीचा प्रभाव त्यांनी अत्यंत दूरदृष्टीने वापरला. कामगार वर्गाच्या प्रश्नांकडे त्यांनी गांभीर्याने पाहिले. औद्योगिक बदलांच्या पार्श्वभूमीवर कामगारांचे शोषण वाढत होते. अशा वेळी त्यांनी कामगारांना संघटित करून त्यांच्या हक्कांसाठी लढा उभारला. स्वतंत्र मजूर पक्षाच्या माध्यमातून त्यांनी कामगारांना राजकीय व्यासपीठ दिले. आठ तासांचा कामाचा दिवस, किमान वेतन, कामगार विमा, प्रसूती लाभ यांसारख्या संकल्पना त्यांनी पुढे आणल्या. संघटनेमुळे कामगारांची वाटाघाटी करण्याची क्षमता वाढली. मालकवर्गालाही त्यांच्या मागण्यांकडे लक्ष द्यावे लागले. कामगार चळवळींमध्ये हजारो लोक सहभागी झाले. संघटनेमुळे आर्थिक न्यायाची चळवळ बळकट झाली. जागतिक कामगार संघटनांच्या तुलनेत भारतीय कामगार संघटनांची ताकद वाढवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी संघटन आवश्यक आहे, हा विचार त्यांनी स्पष्ट केला. आर्थिक न्यायासाठी संघटन हेच सर्वात प्रभावी शस्त्र आहे, आणि संघटित कामगारच अन्यायाच्या साखळ्या तोडू शकतो, हे त्यांनी सिद्ध केले. राजकीय सक्षमीकरणासाठी संघटनात्मक शक्तीचा वापर करताना त्यांनी अत्यंत रणनीतीपूर्ण दृष्टिकोन स्वीकारला. वंचित समाजाला राजकीय प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. गोलमेज परिषदेत (१९३०–१९३२) त्यांनी दलितांच्या हक्कांसाठी ठाम भूमिका मांडली. निवडणुकांमध्ये स्वतंत्र प्रतिनिधित्वाची मागणी केली. बाबासाहेबांनी राज्यघटनेत समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांचा समावेश केला. भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक न्यायाला कायदेशीर बळ दिले. संघटनेमुळे राजकीय जागरूकता वाढली. लोकशाही प्रक्रियेत सहभाग वाढला. मताधिकाराचे महत्त्व लोकांना समजले. संघटनेशिवाय राजकीय सशक्तीकरण शक्य नाही, हा विचार त्यांनी अधोरेखित केला. 'राजकीय शक्ती ही सामाजिक प्रगतीची गुरुकिल्ली आहे' या त्यांच्या विचारानेच वंचित समाजाला सत्तेच्या केंद्रापर्यंत पोहोचण्याचा मार्ग दाखवला. शिक्षण–क्षेत्रात संघटनात्मक शक्तीचा वापर करून त्यांनी ज्ञानक्रांती घडवली. शिक्षण हे मुक्तीचे शस्त्र आहे, हा विचार त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून साकार केला. वसतिगृहे, शाळा आणि शैक्षणिक संस्था उभारून वंचितांना शिक्षणाची दारे खुली केली. विद्यार्थ्यांना संघटित करून त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित केले. १९४५ मध्ये त्यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीने शैक्षणिक क्षेत्रात मोठा बदल घडवला. त्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली. संघटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला. सामूहिक अभ्यास आणि मार्गदर्शनाची संस्कृती निर्माण झाली. शिक्षण आणि संघटन यांचा संगम हा समाजपरिवर्तनाचा पाया आहे, हा विचार त्यांनी रुजवला. ज्ञानाच्या माध्यमातून सशक्त झालेला समाजच संघटनात्मकदृष्ट्या सक्षम बनतो. शिक्षण आणि संघटन यांची सांगड हीच प्रगतीची खरी गुरुकिल्ली आहे आणि ज्ञानसंपन्न समाजच सशक्त संघटन उभारू शकतो, हा संदेश त्यांनी दिला.

मार्गदर्शक वारसा–

संघटनात्मक शक्ती ही समाजपरिवर्तनाची जीवनरेखा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला हा वारसा आजही तितकाच प्रभावी आणि मार्गदर्शक आहे. संघटनेमुळे व्यक्तीला आत्मविश्वास मिळतो. समाजाला दिशा मिळते. राष्ट्राला स्थैर्य मिळते. संघटनेशिवाय प्रगती अपूर्ण राहते. प्रत्येकाने आपल्या क्षेत्रात संघटन उभे करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सामूहिकतेतून निर्माण होणारी ऊर्जा कोणत्याही आव्हानावर मात करू शकते. संघटनात्मक शक्तीचा योग्य वापर केल्यास विषमता दूर करता येते.
न्याय, समता आणि बंधुता या मूल्यांची स्थापना करता येते. या विचारांचे आचरण करणे हीच खरी कृतज्ञता ठरेल. संघटनेतूनच समतेचा सूर्य उगवतो आणि त्या प्रकाशातच मानवतेचा खरा विजय उजळून निघतो. १३५ व्या जयंतीनिमित्त बाबासाहेबांच्या विचारांचे केवळ स्मरण करून चालणार नाही, तर त्यांचे आचरण करणे हीच खरी आदरांजली ठरेल. संघटन, शिक्षण आणि संघर्ष या त्रिसूत्रीला आत्मसात करून समाजात समतेची मशाल प्रज्वलित ठेवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्यांच्या विचारांचा प्रकाश आपल्या कृतीतून झळकला, तरच त्यांच्या कार्याला खर्या अर्थाने न्याय मिळेल. अन्यायाविरुद्ध उभे राहणारा, समतेसाठी झगडणारा आणि मानवतेचा सन्मान करणारा समाज घडवणे, हीच त्यांच्या जयंतीची खरी पूर्तता ठरेल. या प्रेरणेने समतेचा प्रवास पुढे नेणारी सजग पिढी घडली, तर लोकशाही अधिक सुदृढ, संवेदनशील आणि मानवमूल्यांनी संपन्न भवितव्य नक्कीच आकार घेईल.

## गौतम बुद्धांचे अष्टांगिक मार्ग



सम्यक दृष्टी: सत्य आणि असत्य यातील फरक समजून घेणे, दुःखाचे कारण आणि चार आर्य सत्य समजून घेणे।
सम्यक संकल्प: निःस्वार्थ, करुणा आणि अहिंसक विचार ठेवण्याचा दृढ निश्चय करणे।
सम्यक वाचा: खोटे न बोलणे, कोणाला दुखावणारी भाषा न वापरणे, म्हणजेच सत्य आणि प्रिय बोलणे।
सम्यक कर्मांत: हिंसा, चोरी आणि अनैतिक कर्मांपासून दूर राहून सत्कर्म करणे।सम्यक उपजीविका: अनैतिक किंवा इतरांना इजा पोहोचवणारा व्यवसाय न करता, प्रामाणिक मार्गाने उपजीविका करणे।सम्यक व्यायाम / प्रयत्न: मनात चांगले विचार आणण्यासाठी आणि वाईट विचार दूर करण्यासाठी प्रयत्नशील राहणे।सम्यक स्मृती: आपल्या शरीराच्या, भावनांच्या आणि विचारांच्या कृतींवर जागरूक किंवा सावध राहणे।सम्यक समाधी: मन एकाग्र करणे, मानसिक शांततेसाठी ध्यानधारणा करणे।

## निरोगी जीवनासाठी

रोज सकाळी लवकर उठून व्यायाम करणे, सकस व संतुलित आहार घेणे (फळे, भाज्या, प्रथिने), पुरेसे पाणी पिणे (दिवसभरात ८–१० ग्लास) आणि दररोज ७–८ तासांची शांत झोप घेणे अत्यंत आवश्यक आहे १, २, ६, ११. प्रक्रिया केलेले अन्न, साखरेचा अतिवापर आणि ताणतणाव टाळल्यास वजन नियंत्रित राहते आणि गंभीर आजारांचा धोका कमी होतो १, ५, ६.
आरोग्यदायी जीवनशैलीसाठी महत्त्वाच्या टिप्स –
सकस आहार: आहारात हिरव्या पालेभाज्या, फळे, कडधान्ये आणि प्रथिनांचा (झींशळप) समावेश करा ७, १०.
नियमित व्यायाम: दररोज किमान ३० मिनिटे वेगाने चालणे, योगासने किंवा व्यायाम करापुरेसे पाणी: शरीराला हायड्रेटेड ठेवण्यासाठी पुरेसे पाणी प्या ११.
ताण व्यवस्थापन: मानसिक आरोग्यासाठी ध्यान (चशवळींरींळेप) किंवा योग करा १.झोप: दररोज रात्री ७–८ तासांची शांत झोप घ्या व्यसनमुक्ती: धूम्रपान आणि मद्यपानासारख्या वाईट सवयी टाळा ६.
नियमित तपासणी: वयाच्या २५–३० नंतर वर्षातून एकदा फुल बॉडी चेकअप करा
घरगुती टिप्स:सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी १–२ ग्लास कोमट पाणी प्या.जेवणात साखरेचा आणि मिठाचा वापर कमी करा.
रात्रीचे जेवण हलके आणि झोपण्यापूर्वी किमान २ तास आधी घ्या
टीप: कोणताही नवीन आहार किंवा व्यायामाचा प्रकार सुरू करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या.



### १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा




आत्मविश्वासी असणे देखील गरजेचे आहे. याने समस्या दूर होईल.विशेष: स्वस्थ विचार स्वस्थ शरीर ठेवण्यात मदत करतात. या प्रकाराच्या समस्यांसाठी मनातील भावना देखील जवाबदार असतात. सतत वासना, उत्कट विचार स्वप्रदोष किंवा शीघ्रपतन सारख्या समस्यांसाठी कारणीभूत ठरतात.अशात स्वस्थ विचार ठेवणे आवश्यक आहे कारण ही समस्या केवळ शारीरिक नसून मानसिक देखील असते. म्हणून आनंदी आणि आत्मविश्वासी असणे देखील गरजेचे आहे.

### २ Joke — विनोद




रमेश डोळे मिटून आरशासमोर उभा होता. त्याची आई त्याला म्हणाली, ङ्गरमेश, डोळे मिटून आरशासमोर कशाला उभा राहिला आहेस?फ
ङ्गअगं, मी झोपलो की कसा दिसतो ते मला बघायचं आहे.

### ३ Message — संदेश



33 karod Devi Devtaon
33 karod Devi Devtaon
se Meri
ek hi Vinati
hai ki..
.
Sab Mujhko
Sirf 1,1 Rupya de do...


### ४ Thought — सुविचार



उद्योगावाचून शक्तीचा उपयोग नाही.
– पंचतंत्र

**संस्कृत सुभाषित**
**अमर्षजो हि संताप: पावकाद्दीप्तिमत्तर:**
**(वन पर्व, अध्याय ३५, ेक ११, महाभारत)**
अर्थ – असहिष्णुतेमुळे येणारा संताप अग्निपेक्षाही जास्त प्रखर असतो.

## मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. दिवसाची चाकोरी (ला.)
५. तडीपार
७. बहुदा उसने बळ
९. जुगाराचा एक प्रकार
१०. अमावस्या
११. गांधीजींच्या आंदोलनाचा मार्ग
१२. गंध
१४. नजरकैद, अटक
१६. योग्य, बरोबर
१८. संताप
१९. रूक्ष, कोरडे
२२. सेवक
२३. मृत्यू नसलेला
२४. बातमी
२५. उत्तरदायित्व, जोखीम
२७. किरकोळ सामान
३०. भार, बोजा
३१. शेवटचा पांडव
३३. गाडीचे छत
३५. विजार
३६. वरपांगी
३८. वटवट, त्रास
३९. पदर
४१. दरवाजा
४२. आरोप
४३. सवय, उत्तर दिशा
४४. देवाण–घेवाण
४८. आस, अक्ष
४९. बडबड्या
५०. प्रेत
५२. निवासस्थान
५३. सर्वांना सारखे प्रमाण
५५. रेचक
५६. वागणूक
५७. किंमत
५८. नवीन आलेला
६०. लहानच्या विरुद्ध
६१. कोवळ्या दुधाचा पदार्थ
६२. दिवसभराचे एकूण काम
६४. यापेक्षा चांगला गोंद कुठला?
६६. भांडण
६७. मस्ती, जोम
६८. पोते शिवण्याची जाड सुई
६९. खोदकाम
७१. पोपट
७३. सैन्याचा दाणागोटा
७४. वाळवी, उणीव
७५. अनौपचारिक सहभोजन

### उभे शब्द

१. रम्य
२. बाजार
३. बंगाली रुपाया
४. घर सोडून निघून जाणे
५. मावळ्यांची युद्धातील घोषणा
६. मर्यादा
७. स्थिती, दशा
८. वस्त्र, कापड
११. मध्यम प्रमाण
१३. '––मंद झाल्या तारका, आता तरी येशील का'
१५. सह, सोबत
१७. थापा मारणारा
२०. आवाजातील घोगरेणा
२१. सज्ज
२२. मोठा भाऊ
२४. धडपड, प्रयत्न
२५. आजूबाजूला
२६. पावाचा गोल प्रकार
२८. धडक
२९. स्पष्ट, रोखठोक बोलणारा
३१. संतोष आनंद
३२. आशीर्वाद
३४. अंदाज, तर्क
३७. नवरदेव
४०. चटकन
४२. सजावट
४४. अवडंबर, धैर्य
४५. उंबरठा
४६. सचिव, मुख्य
४७. किंमत
४८. अंब्याचे मिष्टान्न
४९. चणचण, न्यूनता
५१. मुलगा किंवा मुलगी
५३. चांगली वागणूक
५४. मोबदल्याची अपेक्षा नसलेले पद, हुद्दा इ.
५५. धनको
५९. मरेपर्यंत
६०. मोजणी
६१. हास्याचे पीक
६३. सुसर
६४. उत्सव
६५. फुलातील पुंकेसर
७०. पुरुष
७२. वैताग (ला.)

### आडवे उत्तर

१.रहाटगाडगे ५.हद्दपार ७.अवसान
९.मटका १०.अवस ११.सत्याग्रह १२.वास
१४.स्थानबद्ध १६.यथार्थ १८.राग १९.रखरखीत
२२.दास २३.अमर २४.रबर २५.जबाबदारी
२७.सटरफटर ३०.वजन ३१.सहदेव ३३.टप
३५.पायजमा ३६.वरवर ३८.कटकट ३९.पालव
४१.दार ४२.आळ ४३.सव ४४.आदानप्रदान
४८.आरा ४९.वाचाळ ५०.कलेवर ५२.धाम
५३.समसमान ५५.सारक ५६.वर्तन ५७.दर
५८.नवागत ६०.मोठा ६१.खरवस ६२.कामकाज
६४.सरस ६६.कलह ६७.रग ६८.दाभण
६९.खनन ७१.रावा ७३.रसद ७४.कसर
७५.अंगतपंगत

### उभे उत्तर

१.रमणीय २.हाट ३.टका ४.गेहत्याग
५.हरहर महादेव ६.पारावार ७.अवस्था
८.वसन ११.सरासरी १३.सखी १५.बोरबर
१७.थापेबाज २०.खर २१.तत्पर २२.दादा
२४.खटपट २५.जवळपास
२६.बनपाव २८.टक्कर २९.फटकळ
३१.समाधान ३२.वरदान ३४.अटकळ
३७.वर ४०.लवकर ४२.आरास ४४.आव
४५.दारवठा
४६.प्रधान ४७.दाम ४८.आमरस
४९.वानवा ५१.लेक ५३.सदवर्तन
५४.मानद ५५.सावकार ५९.ताहहयात
६०.मोजदाद ६१.खसखस
६३.मगर ६४.सण ६५.पराग ७०.नर
७२.वात





# १५ वर्षांचा वैभव सूर्यवंशी या मालिकेतून करणार टीम इंडियात पदार्पण



**नवी दिल्ली:** १५ वर्षांचा वैभव सूर्यवंशी आयपीएलनंतर होणाऱ्या भारताच्या या टी-२० मालिकेतून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्यासाठी सज्ज झाला आहे.आयपीएल २०२६ मध्ये १५ वर्षांचा वैभव सूर्यवंशी धुमाकूळ घालत आहे. आयपीएल पदार्पण, अंडर-१९ क्रिकेट आणि अंडर-१९ विश्वचषकातील त्याच्या उत्कृष्ट कामगिरीने सातत्याने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. वैभवची मोठे फटके खेळण्याची क्षमता आणि आक्रमक दृष्टीकोन यामुळे तो अवघ्या काहीच चेंडूत मोठी खेळी साकारतो. त्याची ही कामगिरी पाहून वैभवला लवकरच भारतीय संघात आंतरराष्ट्रीय पदार्पणाची संधी दिली पाहिजे, अशी सातत्याने मागणी होत आहे. आता वैभवच्या पदार्पणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

आयपीएल २०२६ मध्ये वैभव सूर्यवंशी राजस्थान रॉयल्सकडून खेळत आहे. सलामीवीर वैभवने आतापर्यंत दोन वेळा १५ चेंडूत अर्धशतक करण्याचा विक्रम केला. वयाच्या अवघ्या १५व्या वर्षी त्याने अनेक विक्रम आपल्या नावे केले आहेत. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील उत्कृष्ट गोलंदाज असलेले जसप्रीत बुमराह, भुवनेश्वर कुमार आणि जोश हेझलवुडच्या गोलंदाजीवर त्याने षटकारांची आतिषबाजी केली.

ङ्गतो आयर्लंड दौऱ्यासाठीच्या दावेदारांपैकी एक असून, निवड समितीने इतर अनेक खेळाडूंसोबत त्याचं नाव शॉर्टलिस्ट केलं आहे,ङ्ख असं सूत्रांनी सांगितलं. या डावखुऱ्या फलंदाजाने गेल्या हंगामात जगातील काही सर्वोत्कृष्ट गोलंदाजांना धूळ चारली होती. या वर्षीही तो आपला फॉर्म कायम ठेवत खेळत आहे.या हंगामात आतापर्यंत वैभव सूर्यवंशीने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध २६ चेंडूंमध्ये ७८ धावा, चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध १७ चेंडूंमध्ये ५२ धावा आणि मुंबई इंडियन्सविरुद्ध १४ चेंडूंमध्ये ३९ धावा केल्या आहेत. त्याने जसप्रीत बुमराहच्या पहिल्याच चेंडूवर षटकार मारला आणि जोश हेझलवूडसारख्या गोलंदाजांचाही पूर्ण आत्मविश्वासाने सामना केला.डठक तड ठठ: प्रफुल हिंगेने पदार्पणात घडवला इतिहास! खझङच्या १९ वर्षांमध्ये अशी कामगिरी करणारा पहिलाच गोलंदाज

राष्ट्रीय निवड समिती या युवा खेळाडूला भारतीय संघात स्थान देण्यासाठी जास्त वेळ थांबू इच्छित नाही, परंतु ते त्याला एका साधारण संघाविरुद्ध खेळण्याची संधी



## थोडक्यात/ संक्षिप्त

### पांड्या बंधूंमध्ये बिनसले की मैदानातील ईर्ष्येचा राग?

मुंबई-इंडियन प्रीमियर लीग हाय-स्कोअरिंग सामन्यात, मुंबई इंडियन्सचा रॉयल चॅलेंजर्स बंगलोरने १८ धावांनी विजय मिळवला. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने ४ गडी गमावून २४० धावा केल्या. प्रत्युत्तरात, मुंबई इंडियन्सने ५ गडी गमावून २२२ धावा केल्या. मात्र, या सामन्यापेक्षा पांड्या बंधूंची सर्वाधिक चर्चा रंगली आहे. दोघांमध्ये मैदानावरील स्पर्धा आहे की खरंच काही बिनसले आहे असेही बोलले जात आहे.

आक्रमक जल्लोष पाहून चाहते चकित

जेव्हा हार्दिक पांड्या आणि कृणाल पांड्या एकमेकांसमोर आले, तेव्हा या सामन्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या दोन भावांमधील स्पर्धा केवळ क्रिकेटपुरती मर्यादित नव्हती, तर त्यांच्या वागण्यामुळे त्यांच्यातील तणावपूर्ण संबंधांबद्दलच्या चर्चांना आणखी बळ मिळाले.

### वानखेडेवर विचित्र ड्रामा! टिम डेव्हिडच्या त्या एका कृतीने अंपायर संतापले;

मुंबई-आयपीएल २०२६ च्या हाय-स्कोअरिंग सामन्यात मुंबई इंडियन्सचा रॉयल चॅलेंजर्स बंगलोरने १८ धावांनी विजय मिळवला. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने ४ गडी गमावून २४० धावा केल्या. प्रत्युत्तरात, मुंबई इंडियन्सने ५ गडी गमावून २२२ धावा केल्या. मात्र, या सामन्यात एक मजेशीर घटना घडली, ज्याने चाहत्यांचे भरपूर मनोरंजन केले. आरसीबीचा स्टार ऑलराउंडर टिम डेव्हिड आपल्या एका खोडकर कृतीमुळे चर्चेत आला. त्याच्या या प्रकारामुळे मैदानावरील अंपायर चिडले, तर माजी कर्णधार रोहित शर्मा हसू आवरू शकले नाहीत.

नेमके काय घडले?ही घटना आरसीबीच्या डावातील १८व्या षटकात घडली. हार्दिक पांड्या यांच्या चेंडूवर टिम डेव्हिडने मोठा षटकार ठोकला.

### टिम डेविडने नियम मोडला, कुछ तो गडबड है म्हणत स्वत:च बॉल चेक करू लागला

मुंबई-आयपीएल २०२६ मध्ये मुंबई इंडियन्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर सामना पार पडला. या सामन्यात आरसीबीच्या संघाने विजय मिळवला आणि मुंबईला १८ धावांनी पराभूत केलं. या सामन्यादरम्यान असं काही झालं ज्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होतोय. आरसीबीचा स्टार फलंदाज टिम डेविड सामन्यादरम्यान अम्पायरशी परवानगी न घेता बॉल तपासू लागला. अंपायरने त्याला बॉल परत करायला सांगितल्यावर सुद्धा तो ऐकत नव्हता. डेव्हिडच्या या कृतीला आयपीएलमधील नियमांचे उल्लंघन समजले जात आहे. यामुळे टीम डेव्हिड विरुद्ध बोर्ड कठोर कारवाई सुद्धा करू शकते.अंपायरने मागितल्यावर सुद्धा नाही दिला बॉल :आयपीएल २०२६ च्या या सामन्यात आरसीबीचा संघ फलंदाजी करत होता.

## मुंबई इंडियन्सचे पुढचे सामने कधी आहेत?

मुंबई-इंडियन प्रिमियर लीगचा १९ वा सीजन सुरु असून यात रोमांच वाढत चालला आहे. आतापर्यंत आयपीएल २०२६ चे एकूण २० सामने झाले असून प्रत्येक संघाने जवळपास ४ किंवा ३ सामने खेळले आहेत. अशातच पॉईंट्स टेबलमध्ये सध्या राजस्थान रॉयल्स संघाने आतापर्यंत चारपैकी चार सामने जिंकले असून ते पॉईंट्स टेबलमध्ये प्रथम स्थानावर आहेत. आयपीएल २०२६ मध्ये एकूण २० सामने खेळवले गेले असून अजून ५० लीग सामने शिल्लक आहेत. मुंबई इंडियन्स हा आयपीएलमधील सर्वात यशस्वी संघ असून त्यांनी आतापर्यंत ५ वेळा या स्पर्धेचे विजतेपद पटकावलं आहे. मुंबई इंडियन्स हा आयपीएलमधील यशस्वी संघ सुद्धा आहे. तेव्हा मुंबई इंडियन्सला पुढील स्पर्धेत अजून किती सामने खेळायचे आहेत?

आयपीएल २०२६ मध्ये आतापर्यंत मुंबई इंडियन्सने एकूण चार सामने खेळले असून यातील फक्त एका सामन्यात मुंबई इंडियन्सचा विजय झालाय. तर तीन सामन्यात त्यांचा पराभव झाला. मुंबई इंडियन्सने आयपीएल सीजनमधील त्यांचा पहिला सामना जिंकला. केकेआरचा त्यांनी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर पराभव केला. यासह मुंबई इंडियन्सने तब्बल १४ वर्षांनी त्यांचा आयपीएल सीजनमधील पहिला सामना जिंकला. तर दुसरा सामना त्यांचा पंजाब किंग्स विरुद्ध झाला. यात सुद्धा त्यांचा पराभव झाला. तर तिसऱ्या सामन्यात राजस्थान रॉयल्स विरुद्ध सुद्धा त्याला पराभवाचा सामना करावा लागला. तर १२ एप्रिल रोजी मुंबई इंडियन्सला आरसीबी विरुद्ध झालेल्या सामन्यात सुद्धा १८ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. यामुळे सध्या मुंबई इंडियन्स पॉईंट्स टेबलमध्ये नंबर ८ वर असून त्यांच्या खात्यात २ पॉईंट्स आणि नेट रन रेट -०.७७२ आहे.

मुंबई इंडियन्सच्या पुढील ५ सामन्यांचे वेळापत्रक :

मुंबई इंडियन्सचा पुढील सामना हा १६ एप्रिल रोजी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर पंजाब किंग्स विरुद्ध होणार आहे. हा सामना संध्याकाळी ७: ३० वाजता सुरु होईल.

२० एप्रिल रोजी मुंबई इंडियन्स विरुद्ध गुजरात टायटन्स यांच्यात अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर सामना होणार आहे. हा सामना संध्याकाळी ७: ३० वाजता सुरु होईल. आयपीएलमध्ये सर्वांचं लक्ष असणारा मुंबई इंडियन्स विरुद्ध चेन्नई सुपरकिंग्स हा हायव्होल्टेज सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर २३ एप्रिल रोजी सायंकाळी ७: ३० वाजता होणार आहे. मुंबई इंडियन्स विरुद्ध सनरायजर्स हैद्राबाद यांच्यात २९ एप्रिल रोजी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर सामना होईल.

२ मे रोजी पुन्हा मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपरकिंग्स हे संघ एकमेकांसमोर येतील. हा सामना चेन्नईतील चेपॉक स्टेडियमवर होणार आहे.

मे महिन्यातील मुंबई इंडियन्सच्या सामन्यांचे शेड्युल :

मुंबई इंडियन्स विरुद्ध चेन्नई सुपरकिंग्स - २ मे (ठिकाण - चेन्नई)

मुंबई इंडियन्स विरुद्ध लखनऊ सुपर जाएंट्स - ४ मे (ठिकाण - मुंबई)

मुंबई इंडियन्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू - १० मे (ठिकाण - बंगळुरू )

मुंबई इंडियन्स विरुद्ध पंजाब किंग्स - १४ मे

मुंबई इंडियन्स विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स - २० मे

मुंबई इंडियन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स - २४ मे (ठिकाण - मुंबई)

मुंबई इंडियन्सचा संघ :

हार्दिक पांड्या (कर्णधार), रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा, रायन रिकेल्टन, रॉबिन मिन्झ, राज बावा, रघू शर्मा, मिशेल सँटनर, कॉर्बिन बॉश, नमन धीर, जसप्रीत बुमराह, ट्रेंट बोल्ट, अल्लाह गफंझार, अश्विनी कुमार, दीपक चहर, विल जैक, शेरफेन रदरफोर्ड, मयंक मारकंडे, शार्दुल ठाकुर, क्विंटन डी कॉक, दानिश मालेवार, मोहम्मद इजहार, अथर्व अंकोलेकर, मयंक रावत.

## रोहितच्या दुखापतीबाबत मोठी अपडेट! आयपीएल २०२६ चे पुढील सामने खेळणार की नाही?



मुंबई-इंडियन प्रीमियर लीगचा २० वा सामना हा मुंबई इंडियन्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात पार पडला. या सामन्यात आरसीबीने मुंबई इंडियन्सवर १८ धावांनी विजय मिळवला. मुंबई इंडियन्सचा या सीजनमधील हा सलग तिसरा पराभव होता. या सामन्यात मुंबईचा स्टार फलंदाज रोहित शर्मा याला दुखापत झाली आणि तो चालू सामन्यात रिटायर्ड हर्ट होऊन मैदानाच्या बाहेर पडला. आता त्याच्या तब्येतीवर एक मोठी अपडेट समोर आली आहे. मुंबई इंडियन्सचा पुढील सामना हा १६ एप्रिल रोजी पंजाब किंग्स विरुद्ध वानखेडे स्टेडियमवर होईल. या सामन्यात रोहित प्लेईंग ११ मध्ये खेळणार की नाही असा प्रश्न उपस्थित होतं आहे.

रोहित शर्माला नेमके काय झाले?

मुंबई इंडिअन्सला विजयासाठी आरसीबीने २४१ धावांचं मोठं आव्हान देण्यात आलं होतं. हे आव्हान पूर्ण करण्यासाठी रोहित शर्मा आणि रायन रिकेल्टन हे दोघे मैदानात उतरले.यावेळी दोघे चांगल्या लयीत होते मात्र १९ धावा केल्यावर रोहितला हॅमस्ट्रिंगची दुखपत झाली. रिटायर्ड हर्ट होऊ बाहेर जाण्यापूर्वी रोहित शर्मावर फिजिओने उपचार केले, मात्र तरी देखील दुखणं थांबलं नसल्याने तो अखेर रिटायर्ड हर्ट होऊन बाहेर पडला. त्याने यावेळी १३ बॉल खेळून १९ धावा केल्या. दरम्यान त्याने २ चौकार आणि १ षटकार मारला. सामना संपल्यावर रोहित शर्माच्या दुखापतीबाबत बोलताना शरफेन रदरफोर्ड म्हणाला की, 'मला पूर्ण खात्री नाही पण त्याला हॅमस्ट्रिंगची दुखपत झालेली आहे. पण मी हे खात्रीशीर सांगू शकत नाही कारण मी डगआउटमध्ये होतो.

दुखापतीवर आली मोठी अपडेट : क्रिकबझने दिलेल्या वृत्तानुसार रोहित शर्माच्या दुखापतीची तीव्रता समजून घेत त्याचा स्कॅन केला जाणार आहे. याचे रिपोर्ट आले की, रोहित शर्मा हा पंजाब किंग्स विरुद्ध खेळणार की नाही याविषयी कळेल. रोहित शर्माने आतापर्यंत तीन सामने यंदाच्या सीजनमध्ये खेळले असून यात एकूण ११८ धावा केल्या आहेत. यातील त्याचा सर्वाधिक स्कोअर हा ७८ धावा असून त्याचा कव्हरेज ३९.३३ इतका होता. आयपीएल २०२६ मध्ये रोहितने एक अर्धशतक ठोकलं आहे. पॉईंट्स टेबलमध्ये मुंबई इंडियन्स कितव्या स्थानी? मुंबई इंडियन्स रविवारी यंदाच्या सीजनमधील सलग तिसऱ्या सामन्यात पराभूत झाली. मुंबई इंडियन्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात झालेल्या सामन्यानंतर आयसीबीचा संघ पॉईंट्स टेबलमध्ये नंबर ३ वर आहे. त्यांनी चारपैकी १ सामना गमावला अणि तीन सामने जिंकले, ज्यामुळे त्यांच्या खात्यात ६ पॉईंट्स आहेत. तर मुंबई इंडियन्सचा संघ पॉईंट्स टेबलमध्ये आठव्या स्थानावर आहे. त्यांनी लागोपाठ तिसरा सामना गमवला, ज्यामुळे त्यांच्या खात्यात २ पॉईंट्स आणि नेट रन रेट -०.७७२ आहे.

# आयपीएलची एक मॅच खेळून किती कमावतो वैभव सुर्यवंशी?

दिल्ली,१३ एप्रिल (पीएसआय)

वैभव सूर्यवंशी हा बिहारच्या समस्तीपूर जिल्ह्यातील ताजपूर गावातील एक साध्या शेतकरी कुटुंबातील तरुण आहे. वयाच्या अवघ्या ४ वर्षापासून त्याने क्रिकेटची सुरुवात केली. वडील संजीव सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली तो खेळत होता. समस्तीपूर, पटना आणि मुजफ्फरपूर येथील स्थानिक अकादमीत कठोर मेहनत घेत त्याने बिहार संघाकडून घरगुती क्रिकेटमध्ये लवकरच नाव कमावले. आज तो आयपीएलच्या इतिहासातील सर्वात तरुण खेळाडूंपैकी एक आहे. एका सामन्यात तो डाव उलटवू शकतो, असा विश्वास क्रिकेट जगतात निर्माण झाला आहे. आरआर विरुद्ध आरसीबीच्या १६व्या सामन्यात त्याने हे सिद्धही केले. पण वैभव सुर्यवंशीची आयपीएलची कमाईदेखील तगडी आहे. त्याला एक मॅच खेळण्याचे लाखो रुपये मिळतात.



आरआरकडून १.१० कोटींचे कॉन्ट्रॅक्ट

२०२६ च्या आयपीएल लिलावात वैभव सूर्यवंशीला राजस्थान रॉयल्सने (आरआर) १ कोटी १० लाख रुपयांच्या एकूण करारावर सही केली. हा करार आयपीएलच्या नियमांनुसार पूर्ण हंगामासाठी आहे. लिलावात त्याची मागणी होती, पण आरआरने त्याला आपल्या संघात सामील केले. या तरुण खेळाडूला संघाने मोठा विश्वास दाखवला. कराराची रक्कम ही त्याची हमी कमाई आहे, ज्यात कसलीही कामगिरी किंवा सामने खेळणे याचा विचार करावा लागत नाही.

आरआर विरुद्ध आरसीबी सामन्यात धमाकेदार खेळी

आयपीएल २०२६ च्या १६व्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (आरसीबी) ला ६ विकेट्सने पराभूत केले. यात वैभव सूर्यवंशीने २६ चेंडूत ७८ धावा ठोकल्या. ही खेळी पाहून प्रत्येकजण थक्क झाला. सामना आरआरच्या बाजूने वळवण्यात त्याचा मोठा वाटा होता. या एका खेळीने त्याची बाजारातील किंमत अचानक वाढली, असे तज्ज्ञांचे मत आहे. तरुण खेळाडू एका डावात कसा फरक पाडू शकतो, याचे उत्तम उदाहरण ठरले.

प्रत्येक सामन्यातून कमाई

आरआरचा १.१० कोटींचा करार १४ लीग सामन्यांवर आधारित गणला जातो. यामुळे एका सामन्यासाठी बेस सॅलरी सुमारे ७ लाख ८५ हजार रुपये येते. ही रक्कम खेळाडूला कोणत्याही परिस्थितीत मिळते. कामगिरी चांगली नसली तरीही ही रक्कम सुरक्षित आहे. कराराची रक्कम ही हमी कमाई आहे आणि ती हंगामभरात समान वाटली जाते. आयपीएल व्यवस्थापनाने हे नियम स्पष्ट केले आहेत.

आयपीएल नियमांनुसार मिळणारी मॅच फी

आयपीएलच्या सध्याच्या नियमांनुसार प्रत्येक सामन्यासाठी खेळाडूला ७ लाख ५० हजार रुपयांची मॅच फी मिळते. ही रक्कम कराराच्या रकमेपेक्षा वेगळी आहे आणि ती प्रत्येक सामन्यासाठी स्वतंत्रपणे दिली जाते. वैभवसारख्या तरुण खेळाडूला ही फी अतिरिक्त उत्पन्नाचे साधन बनते. ही फी संघाकडून थेट दिली जाते आणि ती कामगिरीवर अवलंबून नसते.

एकूण एका सामन्यातील कमाई


वरील दोन्ही रकमांची बेरीज केल्यास वैभव सूर्यवंशी एका सामन्यात सुमारे १५ लाख ३५ हजार रुपये कमावतो. यात ७.८५ लाख बेस सॅलरी आणि ७.५० लाख मॅच फी समाविष्ट आहे. आरआर विरुद्ध आरसीबी सामन्यात त्याने ही रक्कम पूर्णपणे कमावली. ही रक्कम फक्त एका दिवसाच्या मेहनतीची आहे, पण त्यामागे वर्षभराची तयारी आणि मेहनत आहे. आयपीएलमध्ये अशा तरुण खेळाडूंना ही कमाई प्रोत्साहन देते.

भविष्यातील संधी

या एका सामन्यातील १५ लाखांहून अधिक कमाईने वैभव सूर्यवंशीचे नाव आयपीएल जगात आणखी चमकले. त्याची बाजारातील किंमत वाढली आहे आणि पुढील लिलावात तो आणखी मोठा करार मिळवू शकतो. बिहारसारख्या छोट्या राज्यातील शेतकरी कुटुंबातील मुलासाठी ही कमाई स्वप्नवत आहे. आयपीएल फक्त पैसे नाही, तर मेहनतीला न्याय देणारे प्लॅटफॉर्म असून वैभवसारखे खेळाडू पुढील पिढीला प्रेरणा देताना दिसतायत.



. चीनची राजधानी बीजिंग येथे बीजिंग हाफ मॅरेथॉन २०२६ मध्ये सहभागी झालेले स्पर्धक.



फ्रान्समधील पॅरिस येथे पॅरिस मॅरेथॉन २०२६ मध्ये सहभागी झालेले स्पर्धक.

# दोन वर्षात शंभर टक्के शेत रस्ते पक्के होणार

## शिबिरातून प्रत्येकाचे समाधान झाले पाहिजे आ. रमेशअप्पा कराड यांचे प्रतिपादन





**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाने मुख्यमंत्री बळीराजा पाणंद शेत रस्ता योजना सुरू केली आहे. या योजनेतून पहिल्या टप्प्यात प्रत्येक मंडळात २५ किलोमीटर रस्त्याचे काम हाती घेतले घेतले जाणार असून येत्या दोन वर्षात लातूर ग्रामीण मतदार संघातला एकही शिव रस्ता शिल्लक राहणार नाही सर्व रस्ते मजबूत होतील असे सांगून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातील समाधान शिबिरात येणाऱ्या प्रत्येक नागरिकांचे समाधानाच झाले पाहिजे अडीअडचणी, तक्रारी त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी यासाठी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी योग्य ती काळजी घ्यावी असे आवाहन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात असलेल्या औसा तालुक्यातील मौजे भादा येथील आयोजित समाधान शिबिराचे उद्घाटन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते सोमवारी झाले. याप्रसंगी तहसीलदार घनश्याम अडसूळ, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिप सदस्या सौ. छायाताई पद्माकर चिंचोलकर, जिप सदस्य महादेव साळुंके, मंडल अध्यक्ष उद्धव काळे, सुरज शिंदे, प्रताप पाटील, राजकिरण साठे, भादा गावचे उपसरपंच बालाजी शिंदे, सहा. गटविकास अधिकारी मनोज राऊत, तालुका कृषी अधिकारी दत्ता हाके, महावितरणचे आर. एम. शेंडे, महिला व बालविकास विभागाच्या मंदाकिनी हिरके, महादेव गुरुशेट्टे, रविंद्र पाटील, देवराव मोहिते, गिरिधर पवार यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी अनेक गावचे सरपंच नागरिक महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, भाजपाच्या नेतृत्वातील पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या केंद्र आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य शासनाने गोरगरीब सर्वसामान्य माणसांना केंद्रबिंदू मानून अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. या योजनेचा प्रत्यक्ष लाभ देण्याचे काम सरकारच्या माध्यमातून होत आहे. शासनाच्या विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ देण्यासाठी, लाभार्थ्यांच्या अडीअडचणी सोडण्यासाठी समाधान शिबिर हा एक त्याचाच भाग आहे. शासनाच्या योजनेपासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत असे बोलून दाखवले.

समाधान शिबिराचा निश्चितपणे अनेकांना लाभ मिळेल फायदा होईल नागरिकांनी आपल्या तक्रारी अडीअडचणी प्रश्न शिबिरातील संबंधिताकडे मांडावेत दोन दिवसात निकाली निघतील असे सांगून आ. रमेशअप्पा कराड यांनी विविध विभागाच्या अधिकाऱ्याकडून योजनेच्या अंमलबजावणीची माहिती दिली काही अधिकाऱ्यांनी मोघम उत्तरे दिली असता माझं समाधान करू शकत नाहीत तर जनतेचे कसे समाधान करणार असा प्रश्न उपस्थित करून चुकीची आणि अपुरी माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांना यापुढे खपवून घेतले जाणार नाही अशी सर्वांसमोर समज दिली.

अतिक्रमीत झालेले सर्व शेतरस्ते सहज खुले झाले तर ठीक नाहीतर कायदेशीर कार्यवाही करून ३० एप्रिल पर्यंत सर्व शेतरस्ते मुक्त करावेत, कबाल्या अभावी घरकुल मिळत नसलेल्या नागरिकांना शासनाच्या नियमानुसार जागा देऊन घरकुलाचे शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण करावे, शासनाच्या धान्य वाटप यंत्रणेत होणारा काळाबाजार तात्काळ थांबवावा, महावितरणने शेतकऱ्याची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी अशा अनेक महत्त्वपूर्ण सूचना आ. रमेशअप्पा कराड यांनी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केल्या.

प्रारंभी तहसीलदार घनश्याम अडसूळ यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती प्रास्ताविकातून दिली. शिबिर परिसरात उभारण्यात आलेल्या विविध स्टॉलला भेट देऊन आ. कराड यांनी समाधान व्यक्त केले. शेवटी पद्माकर चिंचोलकर यांनी आभार मानले. या समाधान शिबिरात संगायो लाभार्थ्यांना मंजुरीपत्र, डिजिटल शिधापत्रिका, ट्रॅक्टर वाटप, रहिवासी आणि उत्पन्न प्रमाणपत्र, जिवंत सातबारा, डिजिटल सातबारा, प्रलंबित फेरफार, आयुष्यमान भारत कार्ड यासह विविध योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास भादा महसूल मंडळात असलेल्या २६ गावातील नागरिक महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवीन ऑनलाईन प्रणाली होणार सुरु





**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना उपचारासाठी आर्थिक सहाय्य अधिक वेगात मिळणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्यावत ऑनलाईन प्रणाली सुरू होणार आहे. या प्रणालीमुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. विशेष म्हणजे आता रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर होणार आहेत. त्यामुळे रुग्णाला कोणत्याही प्रकारचा अर्ज भरावा लागणार नाही. त्यामुळे उपचार प्रक्रियेला गती मिळणार आहे. या प्रणालीचे येत्या काही दिवसातच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उदघाटन करण्यात येणार आहे अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षा कडून देण्यात आली आहे.

गेल्या काही वर्षभरापासून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामध्ये नावीन्य पूर्ण रुग्णस्नेही बदल करण्याचे काम सुरु आहे. त्याचाच एक भाग मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवी ऑनलाईन प्रणाली असणार आहे. रुग्णाने रुग्णालयात सर्व रीतसर कागदपत्रे दिल्यानंतर रुग्णालय प्रशासन त्याचा अर्ज मुख्यमंत्री सहायता निधी कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविणार आहे. त्या ठिकाणी नियमानुसार सर्व कागदपत्रे असल्यास अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. यामुळे रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकाला मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच, गेल्या आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्षप्रमुख रामेश्वर नाईक म्हणाले की, रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी ही ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात येत आहे. यामुळे आता अर्ज मंजुरीची प्रक्रिया जलद होऊन रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नवीन प्रणालीचे अधिकृत उद्घाटन लवकरच होणार असून, त्यानंतर राज्यभरात ती प्रभावीपणे राबवण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी गरजू रूग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

## सौरकृषीपंप लाभार्थ्यांसाठी १५ ते २२ एप्रिल या काळात तक्रार निवारण

**लातूर/प्रतिनिधी :** सौरकृषीपंपाबाबत येत असलेल्या तक्रारींच्या अनुशंगाने लाभार्थी शेतकऱ्यांच्या सौरकृषीपंपाबाबत असलेल्या विविध तक्रारींची दखल घेत महावितरणे गुरूवार ( दि.१५ एप्रिल ते २२ एप्रिल) पासून उपविभागीय स्तरावर तक्रार निवारण मेळाव्याचे आयोजन केले आहे. सौरकृषीपंपाबाबत तक्रार असलेल्या लाभार्थ्यांनी याच लाभ घ्यावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

लातूर विभागांतर्गत येणाऱ्या लातूर ग्रामीण व मुरूड या उपविभागांमध्ये बुधवारी (दि.१५ एप्रिल) उपविभागीय कार्यालयात सौरकृषीपंपाबाबतच्या तक्रारी जाणून घेवून त्याचे निवारण केले जाणार आहे. तसेच रेणापूर व औसा उपविभागात गुरूवारी (दि.१६ एप्रिल) तर कासारशिरसी, किल्लारी या उपविभागात शुक्रवारी (दि.१७ एप्रिल) उपविभागीय कार्यालयात तक्रारी जाणून घेवून त्याचे निवारण केले जाणार आहे. त्याचबरोबर निलंगा व शिरूरअनंतपाळ उपविभागात सोमवारी (दि.२० एप्रिल) मेळावा आयोजीत केला आहे. तर उदगीर शहर, उदगीर ग्रामीण व देवणी या उपविभागात मंगळवारी (दि.२१ एप्रिल) आयोजन करण्यात आले आहे. तसेच शिरूर ताजबंद व अहमदपूर या उपविभागांमध्ये बुधवारी (दि.२२ एप्रिल) उपविभागीय कार्यालयात सौरकृषीपंपाबाबतच्या तक्रारी जाणून घेवून त्याचे निवारण केले जाणार आहे.

दिनांक १५ ते २२ एप्रिल दरम्यान आयोजीत तक्रार निवारण मेळाव्यास लाभार्थी सौकृषीपंप धारक शेतकऱ्यांनी कार्यालयीन वेळेत उपस्थित रहावे. सौकृषीपंपाबाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, शाखा प्रमुख व सौरकृषीपंप एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. शक्य तेवढ्या तक्रारिंचे निवारण जागेवरच होणार असल्याने वीजग्राहकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

## परशुराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त भरगच्च कार्यक्रम

**लातूर/प्रतिनिधी :** भगवान परशुराम जन्मोत्सव सोहळ्या निमित्त परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने यंदा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१७ ते १९ एप्रिल या कालावधीत हे कार्यक्रम होणार असून त्यात गृहउद्योग प्रदर्शनी व पंडित जयतीर्थ मेवुंडी यांची संतवाणी याचे विशेष आकर्षण असणार आहे. जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त अभिषेक व तीर्थप्रसाद,रक्तदान शिबिर तसेच ब्रह्मभूषण पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. दरवर्षी परशुराम जयंती निमित्त उत्सव समितीच्या वतीने कार्यक्रम घेतले जातात. यावर्षीही विविध उपक्रम होणार आहेत. दि.१७ व १८ एप्रिल रोजी कल्पतरू मंगल कार्यालयात गृहउद्योग प्रदर्शनी होणार आहे. दि.१८ रोजी विवेकानंद संस्कार संस्थेत सकाळी ७.३० ते १२ या कालावधीत रक्तदान शिबिर होणार आहे.रविवार दि.१९ एप्रिल रोजी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त परशुराम पार्क येथे अभिषेक व तीर्थप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

संतवाणी हे यावर्षीच्या जन्मोत्सव सोहळ्याचे विशेष आकर्षण आहे. पंडित जयतीर्थ मेवुंडी हे संतवाणी सादर करणार आहेत.विशेष म्हणजे लातूरमध्ये त्यांचा हा पहिलाच कार्यक्रम असणार आहे.दयानंद सभागृहात रविवार दि.१९ रोजी सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. याच दिवशी ब्रह्मभूषण पुरस्कारांचे वितरणही केले जाणार आहे. या सर्व उपक्रमामध्ये लातूरकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,असे आवाहन भगवान परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

महिला सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे पाऊल; विलासराव देशमुख फाउंडेशनतर्फे

# प्रभाग क्र १७ मधील १२८ महिलांना शिलाई प्रशिक्षण प्रमाणपत्र प्रदान



**लातूर/प्रतिनिधी :** विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने प्रभाग क्रमांक १७ मधील प्रगती नगर, एलआयसी कॉलनी येथे सुरू करण्यात आलेल्या मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा यशस्वी समारोप सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या १२८ महिलांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाने आणि ट्वेंटीवन ग्री लि.च्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या पुढाकारतून हे प्रशिक्षण केंद्र चालवण्यात आले होते. महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे आणि स्वयंरोजगाराची संधी मिळावी, या उद्देशाने फाउंडेशनने हा उपक्रम सुरू केला आहे.

या केंद्रात महिलांना ३ महिन्यांचे व्यावसायिक शिलाई प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात शिलाईच्या विविध पद्धती, डिझाइनिंग आणि कटिंग यांसारख्या विषयांचे सखोल ज्ञान महिलांना देण्यात आले. प्रशिक्षक क्रांती उफाडे यांच्या मार्गदर्शनाखाली या १२८ महिलांनी शिलाई कामातील सर्व कला आणि कौशल्ये आत्मसात केली.

या माध्यमातून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांचा प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला विलासराव देशमुख फाउंडेशनच्या विभाग प्रमुख संगीता मोळवणे, अविनाश देशमुख उपसरपंच बाभळगाव, अभिषेक देशमुख मुगळे मॅडम, प्रशिक्षक क्रांती उफाडे, चंद्रज्योति बिरादार, विक्रम बिरादार गजानन बोयणे, सोमनाथ कावळे यांच्यासह प्रशिक्षणार्थी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## उरले शेवटचे काही दिवस! मुंबईतील म्हाडाची २९ लाखांपासूनची घरं गमावू नका; त्वरित करा अर्ज

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई शहरात स्वत:चं हक्काचं घर असावं असं प्रत्येकाला वाटतं. त्यासाठी तो दिवसरात्र मेहनत करुन पैसे गोळा करतो. पण आता हे स्वप्न पूर्ण होण्याची वेळ आली आहे. म्हाडाने मुंबई शहरातील विविध भागांत घरांची सोडत काढली असून नेमकं कोणत्या घरांची सध्या मोठी चर्चा होत आहे,त्याबाबतची सविस्तर आलेली माहिती जाणून घेऊयात. म्हाडाने 'या' भागात आणली स्वस्त घरे सध्या म्हाडाच्या गोरेगाव मधीय घरांची चर्चा सर्वत्र होत आहे. ज्यात पहाडी गोरेगाव भागातील प्रधानमंत्री आवा योजनेअंतर्गत बांधलेली घरे ही अत्यल्प उत्पन्न गटासाठी उपलब्ध आहेत तर या घरांची किंमत ही ३२ लाख ३६ हजार रुपये इतकी ठरवण्यात आलेली आहे. यापूर्वी या भागातील घरांसाठी नागरिकांनी भरभरुन पसंती दाखवली होती आणि या वेळेस सुद्धा हेच चित्र पाहायला मिळत आहे.

# दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स, लातूर येथे BCA प्रथम वर्ष शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील विद्यार्थ्यांच्या पालकांचा मेळावा अत्यंत उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स, लातूर येथे BCA प्रथम वर्ष (FY) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील विद्यार्थ्यांच्या पालकांचा मेळावा अत्यंत उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमास पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

पालक मेळावा यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे IQAC समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण होते. त्यांनी पालकांशी थेट संवाद साधून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले व पालकांनी आपल्या मुलांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

या मेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे पालकांना महाविद्यालयाच्या शैक्षणिक धोरणांची, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची तसेच महाविद्यालयीन कार्यपद्धतीची सविस्तर माहिती देणे हे होते.

या कार्यक्रमामध्ये पालकांना महाविद्यालयाच्या आधुनिक इन्फ्रास्ट्रक्चर, सुसज्ज कॉम्प्युटर लॅब्स, ग्रंथालय सुविधा, तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध प्लेसमेंट संधी याबाबत सखोल माहिती देण्यात आली. त्याचबरोबर BCA अभ्यासक्रमाची रचना, सिलेबसचे स्वरूप, सेमिस्टर पद्धती, आंतरिक व बाह्य परीक्षा पद्धती, प्रोजेक्ट व प्रॅक्टिकल्स याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध अतिरिक्त उपक्रमांबद्दल (Extra Curricular Activities) जसे की तांत्रिक कार्यशाळा, सेमिनार, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, तसेच व्यक्तिमत्व विकास उपक्रम यांची माहिती पालकांना देण्यात आली. यासोबतच विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती (Attendance), शिस्त, तसेच शैक्षणिक प्रगतीचे सातत्य याबाबतही प्राध्यापकांनी पालकांना मार्गदर्शन केले.





यावेळी उपस्थित पालकांनीही आपले मनोगत व्यक्त करून महाविद्यालयाच्या शैक्षणिक दर्जा, सुविधा व विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी घेतल्या जाणाऱ्या प्रयत्नांबद्दल समाधान व्यक्त केले. पालक-शिक्षक संवाद अधिक दृढ करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे IQAC समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. अशोक वाघमारे, BCA विभाग प्रमुख डॉ. शशिकांत स्वामी तसेच BBA विभाग प्रमुख डॉ. वैशाली सातपुते यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमास BCA विभागातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते व त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. गीतांजली यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. दिपाली शेख यांनी केले. पालक मेळावा यशस्वीरित्या पार पडण्याकरता बीसीए विभागातील सर्वच प्राध्यापकांनी मोलाची कामगिरी केली.

सदर पालक मेळावा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस चालना देणारा, पालक-शिक्षक संवाद दृढ करणारा व महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण परंपरेचा प्रत्यय देणारा ठरला.

## सॅलरी आणि इंक्रीमेंटवरुन कर्मचाऱ्यांचा तुफान राडा, गाड्यांची तोडफोड, पोलिसांकडून हवेत गोळीबार

नोएडा : सॅलरी आणि इंक्रीमेंटवरून खासगी कंपनीतील कर्मचाऱ्यांचं मागच्या ७० तासांहून अधिक काळ आंदोलन सुरू आहे. अखेर त्यांचा संयम संपला आणि आंदोलनानं तीव्र वळण घेतलं आहे. आंदोलकांनी राडा घातला. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रू धुराचा वापर करावा लागला. इतकंच नाही तर पोलिसांनी हवेत गोळीबार केला. मागच्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनाचा सोमवारी अचानक भडका उडाला. नोएडातील फेज-२ परिसरात पगार वाढ आणि चांगल्या सोयीसुविधांसाठी आंदोलन करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला. परिस्थिती इतकी हाताबाहेर गेली की, संतप्त जमावाने पोलिसांच्या गाड्यांवर दगडफेक करत काही वाहने चक्क पेटवून दिली. यामुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, ठिकठिकाणी पोलीस तैनात करण्यात आले आहेत. सोमवारी सकाळपासूनच सेक्टर-८४ आणि फेज-२ परिसरात मोठ्या संख्येने खासगी कंपन्यांचे कर्मचारी जमा झाले होते. पगारवाढीच्या मागणीसाठी हे कर्मचारी रस्त्यावर उतरले. जेव्हा पोलिसांनी जमावाला पांगवण्यासाठी सौम्य लाठीचार्ज केला, तेव्हा आंदोलकांचा संयम सुटला. बघता बघता शांततेत सुरू असलेल्या निदर्शनांनी हिंसक वळण घेतलं. दोन ते तीन गाड्यांना आग लावण्यात आली.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.






शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## माधवराव पाटील महाविद्यालयाच्या ग्रंथालयात सामाजिक समता दिन साजरा



मुरुम (प्रतिनिधी)- यंदाचे वर्ष हे महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनाकडून दि. ८ ते १४ एप्रिल या सप्ताह कालावधीत संपूर्ण राज्यभरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रमानिमित्ताने वाचन उपक्रम शनिवारी (ता.११) रोजी आयोजित करण्यात आला होता. या वाचन उपक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार होते. यावेळी ग्रंथपाल डॉ. राजकुमार देवशेट्टे, डॉ. सायबण्णा घोडके, डॉ. रविंद्र गायकवाड, डॉ. महेश मोटे, डॉ. सुधीर पंचगल्ले, प्रा. राजकुमार रोहीकर, डॉ. अविनाश मुळे, डॉ. राजेंद्र गणापुरे, प्रकाश रोडगे आदींची विशेष उपस्थिती होती. प्रारंभी महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पद्मश्री डॉ. रंगनाथन यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी, या उद्देशाने ग्रंथालयात विविध ग्रंथांचे वाचन उपक्रमांतर्गत दिवसभर ग्रंथालय खुले ठेवून वाचन दिन उस्फूर्तपणे साजरा करण्यात आला. डॉ. नागोराव बोईनवाड, दत्तू गडवे, नितीन कंटेकुरे, विजयालक्ष्मी भालेराव आदींनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. गोपाळ कुलकर्णी तर आभार डॉ. मुकुंद धुळेकर यांनी मानले. यावेळी विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

## वडगाव येथे सामाजिक समता सप्ताह उत्साहात; ५२ तरुणांचे रक्तदान, ९८ जणांची आरोग्य तपासणी



धाराशिव (जिमाका)- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, धाराशिव यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त तसेच महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त ८ एप्रिल ते १४ एप्रिल दरम्यान जिल्ह्यात विविध ठिकाणी सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत दि.११ रोजी वडगाव (ता.धाराशिव) येथे क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमांतर्गत रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, स्वच्छता अभियान तसेच प्रबोधनपर कार्यक्रम घेण्यात आले. विशेष म्हणजे ५२ तरुणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले, तर ९८ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

कार्यक्रमासाठी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सचिन कवले, समाज कल्याण अधिकारी श्री.सनम लामकने, मुरूम नगरपरिषदेचे नगराधिकारी सचिन भुजबळ, प्रमुख व्याख्याते किरण सगर, बार्टीचे प्रकल्प अधिकारी तुषार कदम, समतादूत नागेश फुलसुंदर, किरण चिंचोले, रमेश नरवडे, गणेश मोटे, गोविंद लोमटे, सुहास वाघमारे, अर्चना रणदिवे यांच्यासह गावातील उपसरपंच बबन फुलसुंदर, शालेय समिती अध्यक्ष सचिन पवार, सदस्य सतीश पाटील, किरण फुलसुंदर, शेटीबा पवार, दिलीप माळी, मदार सय्यद, आदम सय्यद तसेच आजी-माजी पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी महापुरुषांच्या जयंतीनिमित्त समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती देत नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. त्यांनी मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना, स्वाधार योजना, ॲट्रॉसिटी कायदा, बचत गटांना ट्रॅक्टर वाटप, जात पडताळणी आदी योजनांची माहिती दिली.

प्रमुख व्याख्याते किरण सगर यांनी अनिष्ट रूढी-परंपरा व बुवा-बापू यांच्या आहारी न जाता महापुरुषांचे विचार आत्मसात करून अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश दिला. दरम्यान, मान्यवरांच्या हस्ते गावातील नव्याने पोलीस व सैन्यात भरती झालेल्या युवकांचा सत्कार करण्यात आला. तसेच रक्तदात्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले व सरपंच बबन फुलसुंदर यांच्या वतीने पाण्याचे जार भेट देण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागेश फुलसुंदर यांनी केले, प्रास्ताविक तुषार कदम यांनी केले तर आभार ग्रामसेवक श्री.जी.व्हि.करदोरे यांनी मानले. कार्यक्रमास गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती यामध्ये महिलांचा सहभागही लक्षणीय होता.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यासागर फुलसुंदर, प्रभाकर साळुंके, विलास फुलसुंदर, डॉ. ज्ञानेश्वर फुलसुंदर, पै. सोमनाथ फुलसुंदर, अमोल साळुंके, महावीर माळी, राजेश फुलसुंदर, पंडित पवार, बबन बेळे, ज्ञानेश्वर भुजबळ, आकाश भुस्कंडे, बापू फुलसुंदर, संजय फुलसुंदर, सोमनाथ साळुंके, ऋषीं बिराजदार, गोविंद लोखंडे, गणेश पाटील, विद्यासागर पाटील, दशरथ माळी, महादेव गायकवाड, विशाल हिरवे यांनी विशेष प्रयत्न केले.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या, लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विमानतळावर आगमन व स्वागत



धाराशिव (जिमाका)- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आज धाराशिव विमानतळावर हेलिकॉप्टरने आगमन झाले. आगमन प्रसंगी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी पुष्पगुच्छ देऊन उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांचे स्वागत केले. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी खासदार रवींद्र गायकवाड माजी आमदार ज्ञानराज चौगुले, उमरगा पंचायत समितीच्या सभापती ॲड.आकांक्षा चौगुले यांनी, जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर व पोलीस अधीक्षक रितू खोखर यांनी तर जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने सरचिटणीस संतोष जाधव व कोषाध्यक्ष संतोष हंबीरे यांनी देखील पुष्पगुच्छ देऊन उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांचे स्वागत केले.

स्वागतानंतर उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी धाराशिव येथे आयोजित दैनिक पुण्यनगरी व जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या पुरस्कार सोहळ्याच्या कार्यक्रम स्थळाकडे प्रयाण केले.

## श्री कुलस्वामिनी आश्रमशाळा जळकोट येथे महात्मा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली



जळकोट(विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी श्री कुलस्वामिनी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीसुर्य महात्मा फुले यांची जयंती उत्साहात साजरा करण्यात आली.

यावेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ जळकोट संस्थेचे सचिव तथा प्राचार्य संतोष चव्हाण साहेब व प्रमुख पाहुणे म्हणून श्री कुलस्वामिनी प्राथमिक आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती आशा पवार मॅडम , पत्रकार सतिश राठोड सर उपस्थित होते.या मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरु करण्यात आले यावेळी.कार्यक्रमाचे प्रास्ताविक माध्यमिक आश्रम शाळेचे सहशिक्षक देवानंद पांढरे सर यांनी शैक्षणिक क्रांतीसाठी आपले जीवन अर्पण करणाऱ्या महात्मा फुले यांच्या विषयी माहिती सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य संतोष चव्हाण साहेबांनी महात्मा फुले हे भारतातील सामाजिक क्रांतीचे अग्रदूत होते. त्यांनी समाजातील अन्याय, अंधश्रद्धा आणि जातिभेद यांविरुद्ध लढा दिला. त्यांनी स्त्री शिक्षणाला विशेष महत्त्व दिले आणि १८४८ साली पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्यांच्या या कार्यात सावित्रीबाई फुले यांचेही मोठे योगदान होते. महात्मा फुले यांनी शेतकरी आणि दलितांच्या हक्कांसाठी आवाज उठवला. त्यांनी 'सत्यशोधक समाज' स्थापन करून समाजात समता आणि बंधुभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला.त्यांच्या विचारांमुळे समाजात नवा बदल घडून आला.आपण त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजात समानता, शिक्षण आणि न्याय यांचे महत्त्व ओळखले पाहिजे. महात्मा फुले यांचे विचार आजही आपल्याला मार्गदर्शन करतात .

आपण सर्वांनी त्यांच्या आदर्शांचे पालन करून एक सुजाण आणि सुसंस्कृत समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.यावेळी आश्रम शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी सुंदर भाषणे केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नागेंद्र गुरव , सुरेश कोकाटे , रविकिरण चव्हाण ,अभिजीत चव्हाण ,किरण ढोले , बाळासाहेब मुखम , आप्पासाहेब साबळे ,बालाजी राठोड , किरण कांबळे , श्रीमती शांताबाई चौगुले , श्रीमती मिरा पवार , प्रमिला कुचंगे, कल्पना लवंद ,अश्विनी लबडे ,कुमारी मयुरी कांबळे, दुर्गेश कदम सर, सागर चव्हाण सर, अमितसिंह खारे, शंकर चव्हाण यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष दुधभाते सर केले तर आभार खंडेराव कारले सर यांनी मानले यावेळी मुख्याध्यापक सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

## सामाजिक समता सप्ताहानिमित्त धाराशिवमध्ये स्वच्छता मोहिम ; फकीरा नगर व बौद्ध नगरमध्ये उपक्रम संपन्न



धाराशिव (जिमाका)- सामाजिक न्याय, आर्थिक व सामाजिक संरक्षण उपलब्ध करून देण्याबाबत राज्य सरकार सातत्याने प्रयत्नशील आहे. त्याअनुषंगाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व वंचित दुर्बल घटकातील व्यक्तींच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाकडून विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.

या सर्व कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच जनतेत जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने दरवर्षी दि.८ ते १४ एप्रिल या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात येतो.

त्यानुसार सामाजिक समता सप्ताहानिमित्त आज १२ एप्रिल रोजी धाराशिव शहरातील फकीरा नगर व बौद्ध नगर येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीमध्ये स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.या स्वच्छता मोहिमेत सहायक आयुक्त समाज कल्याण सचिन कवले, समाज कल्याण अधिकारी सचिन लामकाने तसेच नगर परिषदेचे कर्मचारी उपस्थित होते.

## महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभ्यासाने अभिवादन

धाराशिव, दि. १० (प्रतिनिधी) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय, धाराशिव येथे 'अभ्यास अभिवादन' हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. जीएनएम व एएनएम परिचारिका विद्यार्थ्यांनी तब्बल १२ तास सलग अभ्यास करून महामानवांना अभिवादन केले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती आयोजित परिचारिका प्रशिक्षण सभागृहात पार पडलेल्या या उपक्रमात सकाळी ७ ते सायंकाळी ७ या कालावधीत १०० हून अधिक विद्यार्थी शांततेत अभ्यासात तल्लीन झाले होते. नीरव वातावरणात ज्ञानार्जन करत विद्यार्थ्यांनी आंबेडकरांच्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या संदेशाला कृतीत उतरवले.

उपक्रमाचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा सखोल अभ्यास करून समाजसेवेत योगदान द्यावे, असे आवाहन केले. कार्यक्रमास अतिरिक्त सिव्हिल सर्जन डॉ. तानाजी लाकाळ, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. फुलारी, डॉ. भास्कर साबळे, मेट्रन सुमित्रा गोरे, प्राचार्य रवी सुरवसे यांच्यासह शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना चहा व नाश्त्याची सोय करण्यात आली होती. तसेच सर्वांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या अभिनव उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

## अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (जिमाका)-लोहारा पोलीस ठाणे अंतर्गत विठ्ठल वय ४८ वर्षे, रा.धानुरी ता. लोहारा जि. धाराशिव हे दि.११.०४.२०२६ रोजी अजित मुंसाडे यांचे पान टपरीजवळ धानुरी येथे अंदाजे ३,३०० किंमतीची ३३ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये लोहारा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar, Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers, Mitra Nagar, Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649